# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक

वर्ष 26 अंक 3 जून 2015

**या अंकात**


| | |
|---|---|
| 2. अराजकतेचे व्याकरण | डॉ .बाबासाहेब आंबेडकर |
| 2. इहवादः मानवी प्रतिष्ठेचा महाप्रकल्प | *यशवंत मनोहर* |
| 9. सत्तांतर आणि निष्ठांतर | *सुरेश द्वादशीवार* |
| 14. दाटून येते सारे.... | *मेधा पाटकर* |
| 20. त्रुटित जीवनी.... | *अतुल देऊळगावकर* |
| 23. नाव नामदेवाचे ...काम ठेकेदारांचे! | *सुभाष थोरात* |
| 26. गूगल आपल्याला मठ्ठ तर करत नाही ना? | *प्रभाकर नानावटी* |
| 29.'मनरेगा''च्या कंत्राटीकरणाचा धोका! | *अश्विनी कुलकर्णी* |
| 31. चित्रगुप्ताची चोपडी | *य. ना. वालावलकर* |
| 33. कुंभारवाडा | *राजेश घासकडवी* |


संस्थापक – संपादक

**दि. य. देशपांडे**

(1918-2006)

कार्यकारी संपादक

**प्रभाकर नानावटी**

**संपर्कः**

प्रभाकर नानावटी pkn.ans@gmail.com 9503334895

भरत मोहनी bharat_i@yahoo.com 9822736808

aajacha.sudharak@gmail.com

# अराजकतेचे व्याकरण

केवळ बाह्य स्वरूपात नव्हे, तर प्रत्यक्षात लोकशाही अस्तित्वात यावी अशी जर आपली इच्छा असेल, तर त्यासाठी आपण काय करायला हवे? माझ्या मते पहिली गोष्ट जी केलीच पाहिजे ती अशी की, आपल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आपण संवैधानिक मार्गाचीच कास धरली पाहिजे. याच अर्थ हा की, क्रांतीचा रक्तरंजित मार्ग आपण पूर्णत: दूर सारला पाहिजे. याचा अर्थ कायदेभंग, असहकार आणि सत्याग्रह या मार्गांना आपण दूर ठेवले पाहिजे. आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टपूर्तीसाठी संवैधानिक मार्गासारखा कोणताही मार्ग शिल्लक नव्हता, त्यावेळी असंवैधानिक मार्गाचा अवलंब करण्याचे समर्थन मोठ्या प्रमाणात केले जात होते. परंतु जेव्हा संवैधानिक मार्ग उपलब्ध आहेत तेव्हा या असंवैधानिक मार्गाचे समर्थन होऊ शकत नाही. हे मार्ग इतर काही नसून अराजकतेचे व्याकरण आहे आणि जितक्या लवकर आपण त्यांना दूर सारू तेवढे ते आपल्या हिताचे होईल.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

●●●

# इहवाद : मानवी प्रतिष्ठेचा महाप्रकल्प

*यशवंत मनोहर*

इहवाद विवेकवाद

पृथ्वीच्या पाठीवरील प्रत्येक माणसाचे जन्मापासून मृत्यूपर्यंतचे जीवन म्हणजे इहजीवन. एकेका माणसाचे जीवन इथे संपते, पण अशा संपण्याने मानवी जीवनाचा प्रवाह संपत नाही. जीवनाची श्रृंखला कोणत्याच कडीला शेवटची कडी मानत नाही. सतत नवनव्या कड्या उगवत राहतात. त्यामुळे ऐहिक मानवी जीवन कधी विझून जात नाही. जीवनाची वाहिनी कधी आटूनही जात नाही.

माणसाचे इहजीवन हाच इहवादाचा एकमेव विषय आहे. इहजीवनाची उज्ज्वलता हाच त्याचा ध्यास आहे. माणूस हाच जीवनाचा नायक आहे. भोवतीचे मानवी जीवन त्यानेच निर्माण केले आणि ही अधिकाधिक उज्ज्वल मानवी जीवन निर्माण करण्याची प्रक्रियाही खंडित होणे त्याने मान्य केले नाही. त्यामुळे सतत पुढेपुढे जाणाऱ्या आणि गतीने बोट न सोडणाऱ्या या जीवनाचा महानायकही तोच आहे. सर्वच माणसांच्या जीवनाचा सर्वार्थांनी कर्ताकरविता माणूसच आहे. इहवाद हा निरपवादपणानं माणसाला संपूर्ण मानवी प्रतिष्ठा देऊ इच्छिणारा महाप्रकल्प आहे. या संपूर्ण प्रतिष्ठेच्या

मार्गात येणाऱ्यांविरुद्धची ती लढाई आहे. माणसाच्या पूर्ण प्रकाशनाला कोणतंही ग्रहण लागू नये हा निर्धार या महाप्रकल्पाचा आहे.

इहवाद हा वैश्विक प्रकल्पच आहे. जगातला प्रत्येक माणूसच त्याचा विषय आहे. जगातल्या प्रत्येक माणसाच्या मेंदूवर किंवा प्रत्येक माणसाच्या आयुष्यावर इहवादाची इच्छा कोरलेली आहे. इहवादाचं भाषांतर सेक्युलॅरिझम असं केलं जातं. पण सेक्युलॅरिझमला सर्वधर्मसमभाव वा धर्मनिरपेक्षतावाद म्हणणं इहवादाला मान्य नाही. कोणत्याही एका धर्माचा मुद्दाच नाही. इहवादाला धर्मसंस्थाच मान्य नाही. त्यामुळं इहवादाला वा सेक्युलॅरिझमला सर्वधर्मसमभाव म्हणणं म्हणजे इहवादाच्या गळ्यात आपल्या मर्यादांचा आणि आपल्या सोयीचा पुष्पहार घालण्यासारखंच ठरतं. धर्मांमध्ये खूप भेद असले आणि त्या भेदांचा परिणाम म्हणून अनंत प्रकारच्या मारामाऱ्या असल्या आणि त्यामुळं प्रत्येकच धर्म दुसऱ्या धर्माला शत्रू मानत असला तरी या सर्वच धर्मांमध्ये एक साम्य मात्र असतंच. माणसाच्या जगण्याचा संकोच करण्याच्या बाबतीत त्यांच्यात समभाव असतो. माणसाच्या अमर्याद माणूसपणाचे छोटे-छोटे तुकडे करण्याच्या संदर्भात, माणसांना छोट्या-छोट्या चौकटींमध्ये डांबण्यात आणि त्या चौकटींचा अहंकार पढवण्यात या धर्मांमध्ये समभाव असतो. माणसाचं माणूसपण पुसून त्याला धर्माची काटेरी अस्मिता देण्याच्या संदर्भात मात्र धर्मांमध्ये समभाव असतो. हा धर्मांमधला समभाव माणसांमध्ये जवळजवळ अभेद्य असा विषमभाव निर्माण करतो आणि इमानेइतबारे त्याचं पोषण करतो.

अनेक अज्ञानपीठांनी बऱ्याच लोकांची मनं गोठवूनच ठेवलेली आहेत. त्यामुळं ज्या चुका उकिरड्यावर शोभल्या असत्या त्या चुकांची आरास अशा लोकांनी आपल्या डोक्यांमध्ये मांडलेली आहे. अनेक अज्ञानपरंपरांनी बऱ्याच लोकांना आपल्या खुंटांना बांधूनच ठेवलेलं आहे. या सर्वच अज्ञानपरंपरा आणि ही सर्व अज्ञानपीठं दुनियेच्या परिवर्तप्रक्रियेच्या मार्गात कायम खलनायकाच्या भूमिका करीत आहेत. या खलनायकांनी नद्यांना धरणांमध्ये अडवावं, त्याप्रमाणे लोकांची मनं धर्म आणि धार्मिक अंधश्रद्धांच्या धरणात बंदिस्त केली आहेत. हे लोक मग परिवर्तनाला गुंगारा देत राहतात. परिवर्तनाला फसवल्याच्या उन्मादात जगण्याची सवय त्यांना लागते. सवयींमुळं चुकाही चिरंतन ठरतात. आधी बौद्धिक अंधता निर्माण करायची आणि असत्याला सत्य म्हणून लोकप्रियता प्राप्त करून द्यायची हेच वर्चस्वमनस्कांचं वा सत्तांधांचं पद्धतिशास्त्र असतं. देवाशिवाय, धर्माशिवाय, प्रार्थनांशिवाय, स्वर्गाशिवाय, दैववादाशिवाय वा परलोकाशिवाय माणूस जगू शकत नाही काय? या सर्व अंधश्रद्धांच्या यात्रेशिवाय माणूस जीवन व्यतीत करू शकत नाही काय? या सर्व गोष्टी खरं म्हणजे अनंत शक्यतांची सदाफुली असणाऱ्या माणसाचा आणि त्याच्या सदाफुलीपणाचाच संकोच करतात. ही सर्व सामग्री माणसाचं खुरट्या वनस्पतीत रूपांतर करण्याची वा त्याचं बोन्साय करण्याचीच सामग्री आहे.

इहवाद माणसाच्या शक्तीचा, त्याच्या असीम शक्यतांचा वा त्याच्यातील उदंड अशा नैसर्गिक सृजनप्रेरणांचा संकोच मान्य आणि या वाऱ्याला थांबवणारी भिंत इहवादाला अजिबात मान्य नाही. माणूस हा गतीनं मोहोरणारं झाड आहे आणि या मोहोराची अडवणूक करणाऱ्या देव, धर्म, परंपरा, साहित्य, संस्कृती, परलोक, दैववाद अशा सर्वच गोष्टी माणूसद्रोही आहेत आणि संपूर्ण, स्वयंप्रभ, स्वयंशासित आणि स्वयंसर्जक असू इच्छिणाऱ्या माणसानं त्याला त्याचं अनन्य असं माणूसपण हे सुंदर वैशिष्ट्य नाकारणाऱ्या वरीलपैकी कोणतीही गोष्ट जवळपासही फिरकू देऊ नये. या गोष्टी खरं म्हणजे काल्पनिक आहेत, पण माणसाच्या माणूस असण्याचं वास्तवच त्या उद्धस्त करतात. त्याचं उद्धस्तीकरण टाळण्यासाठी माणसानं वरील सर्वच विघातक कल्पनांचं समूळ उद्धस्तीकरण केलं पाहिजे असं इहवादाला वाटतं.

स्वर्ग, परलोक, पूर्वजन्म-पुनर्जन्म, देव, दैववाद या सर्वच गोष्टी काल्पनिक आहेत, पण या काल्पनिक गोष्टी सरंजामशाहीच्या, भांडवलशाहीच्या वा अशा कोणत्याही नावानं वावरणाऱ्या शोषणशाहीच्या पूर्ण हिताच्या असतात. या गोष्टींच्या आधारानंच सर्व शोषणशाह्या गरिबांना गुलाम करीत असतात. आणि वरील सर्वच गोष्टींच्या मदतीनं ते शोषणाचे परमनंट परवाने मिळवीत असतात. इहवाद या सर्व शोषणशाह्या उद्ध्वस्त करू इच्छितो याचं कारण या शोषणशाह्या गरिबांचं शोषण करतात. या शोषणशाह्या गरिबांच्या लक्षात येणार नाही या पद्धतीनं हे शोषण करतात आणि स्वर्ग, परलोक, पूर्व-पुनर्जन्म, देवदैववाद ही या पद्धतीची कलमे-उपकलमे असतात. या शोषणशाह्या म्हणजे त्यांच्या नाड्या ज्यांच्या हातात असतात, ती वर्चस्वमनस्क माणसंच हे शोषण करतात, पण नाव मात्र देव-दैववादाचं पुढं करतात. ते फक्त देव-दैववादाचा त्यांच्या फायद्यासाठी आणि भाबड्या गरीब मंडळींना बिनदिक्कत लुटण्यासाठी धडधडीत उपयोग करून घेत आहेत हे देवाला वा दैवाला कळतच नाही. याचं कारण देव वा दैव कुठं अस्तित्वातच नाही हे आहे. देव-दैव, परलोक या सर्वच गोष्टी आपल्याला लुटण्याची साधनं आहेत हे सर्वच या सज्जन गरिबांना कळावं असं इहवादाला वाटतं.

इहवाद या सज्जन गरिबांना कोणी लुटू नये यासाठी वरील सर्वच शोषणशाह्यांविरुद्ध लढाई करतो आणि या शोषणशाह्या धर्म, देव, दैव या ज्या काल्पनिक साधनांचा उपयोग करतो, त्या सर्व साधनांच्या निर्मूलनाचा निर्धार करतो. वरील सर्वच साधनांचं निर्मूलन करण्याचं ध्येय हे केवळ बौद्धिक खाज खाजविण्यासाठी नाही. हे ध्येय वास्तवांतरासाठी, स्थित्यंतरासाठी वा नव्या शोषणमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी आहे.

देव-धर्म यांच्याशिवाय माणूस केवळच जगू शकतो असं नाही तर तो अधिकच अर्थपूर्ण पद्धतीनं जगू शकतो. देवविषयक वा परलोकविषयक कल्पनांनी माणसाला कुंडीत बसवलं आहे. त्याच्या संपूर्ण माणूसपणाच्या वाटा त्याच्यासाठी बंद केल्या आहेत. या कल्पनांनी मोहल्ल्या-मोहल्ल्यात भांडणाचे कारखाने काढले ते वेगळेच. या सर्व कल्पनांनी माणसाला जगणंही कठीण केलं आणि स्वतःला निर्माण करण्याचं जे सुख असतं, मानवी प्रतिष्ठेच्या सामग्र्याशी बोलण्यात, त्या सामग्र्याचा सूर्य व्यक्तिमत्त्वात स्थापन करण्यात जे अनिर्वचनीय सुख असतं, त्या सुखाशीही माणसाची गाठ पडू दिली नाही. या सर्व कल्पनांनी साकल्याच्या सागराला पोचण्याआधीच माणसाची नदी मध्येच आटवली.

या कल्पनांनी माणसाला परावलंबी केलं. दुबळं केलं. आणि असं परावलंबन हेच मानवी जीवनाचं सत्य आहे, या खोट्या समजुतीच्या तुरुंगात त्याला कायम कोंडलं. या परावलंबनानं त्याला पुनःपुन्हा उगवण्यासाठी क्षितिजंच ठेवली नाहीत. या क्षितिजविहीनतेनं माणसाला झाडाप्रमाणं सतत तोडलं. या सर्वच कल्पनांनी माणसाला पोपट केलं आणि पिंचऱ्यात डांबलं. या कल्पना सांगतील वा शिकवितील तेव्हढंच माणसानं बोलावं. माणसानं स्वतःचा विचार करू नये. स्वतःच्या अस्तित्व तत्त्वाच्या रचनेचा, पुनर्रचनेचा विचार माणसानं करू नये. स्वतःच्या निखळ मनुष्यमयतेच्या मांडणीचा, फेरमांडणीचा विचार माणसानं करू नये. माणसानं त्याला मारणाऱ्या आणि शोषकांना जगवणाऱ्या कल्पनांना जगवण्याचा विचार तेवढा करावा. माणसानं आणि सज्जन गरिबानं स्वतःच्या उभारणीचा विचार करू नये. त्यानं शोषण जगवावं. अविचार जगवावेत. त्याला लोळवणाऱ्या, त्याला तुडवणाऱ्या वा त्याला मोडीत काढणाऱ्या सर्व गोष्टी त्यानं जगवाव्यात यासाठी वर्चस्वमनस्कांनी अध्यात्माचा, परलोकाचा चकवा निर्माण केला. या गोष्टी त्याला माणूस म्हणून जीवनातून उठवणाऱ्या किंवा जीवनाच्या परिघाबाहेर ढकलणाऱ्या अशा गोष्टी आहेत. परलोकाच्या कल्पनेनं इहलोकाच्या अस्तित्वाला याप्रकारे आग लावण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न धुमाकूळ घालत राहिला, काही

प्रमाणात त्याला यशही मिळत राहिलं, पण त्याला संपूर्ण वा निरपवाद यश कधीच मिळालं नाही. त्याला कारण आहे, जगभरचं इहवादी चिंतन. माणसाचं ऐहिक जीवन, त्याचं इहवादी माणूसपण, त्याची इहवादी ध्येयं, त्याची इहवादी नीती, त्याचं इहवादी साहित्य, त्याचा इहवादी समाज आणि या समाजाचं इहवादी साहित्य या एवढ्याच गोष्टी खऱ्या आहेत. माणसांमधील संबंधाची इहवादी रचना, या संबंधांचं इहवादी व्यवस्थापन तेवढं खरं आहे, अशी इहवादाची भूमिका आहे. सामान्य आणि सज्जन माणसांना वर्चस्वमनस्कांनी भ्रमांच्या महापुरात ढकललं आहे. त्यातून ही माणसं बाहेर येणार नाहीत अशा यंत्रणा हे वर्चस्वमनस्क राबवित असतात. अशा स्थितीत इहवादानं इतिहासभर इहजीवनाच्या विजयाचा, सर्वच माणसांच्या साकल्याचा आणि सर्वच माणसांच्या समान प्रतिष्ठेचा महाप्रकल्प राबवला आहे. त्या प्रकल्पाचं नाव इहवाद आहे. इहवाद ऊर्फ सेक्युलॅरिझम असं या स्वप्नाचं नाव आहे.

इहवाद किंवा सेक्युलॅरिझम या महाप्रकल्पाची रचना पूर्णतः विज्ञाननिष्ठेच्या पायावर आणि बुद्धिवादाच्या बेठकीवर झालेली आहे. देव-दैव, परलोक अशा माणसाला विकलांग आणि विकलमन करणाऱ्या गोष्टी माणसाच्या जीवनात शिरणार नाहीत याची योजना इहवाद देतो. कोणत्याही पातळीवर ईश्वर या कल्पनेची गरज उरणार नाही, असं स्वयंप्रभू मानवी मन निर्माण करणारं हे तत्त्वज्ञान आहे. स्वर्गाच्या आणि परलोकाच्या फंदात पडणार नाही असं अभेद्य बुद्धिवादी मानवी मन निर्माण करणारं हे तत्त्वज्ञान आहे.

चुकीचे प्रश्न माणसाला सुचू नयेत. अप्रस्तुताच्या अरण्यात माणसांनी शिरू आणि भरकटू नये. चुकीच्या प्रश्नांचे आजार माणसांनी जीवनावर लादू नयेत. इहजीवनातले प्रश्न आपल्यामुळेच निर्माण होतात. ते प्रश्न परलोकाच्या नादानं सुटणार नाहीत. ईश्वराच्या शोधानं सुटणार नाहीत. या सर्व कल्पना आहेत आणि त्या माणसाच्याच दुबळेपणानं, आळशी वृत्तीनं आणि त्याच्या आयतेपणाच्या लालसेनं निर्माण केलेल्या आहेत. या कल्पनांनी मग माणसालाच दुबळं, विकृत आणि आळशी केलं. आपल्यावरची जबाबदारी एखाद्या कल्पनेवरती ढकलण्याची तरतूद माणसानं केली, पण या तरतुदीनं त्याच्या साहसाभोवती कुंपणं निर्माण केली. माणसांमध्ये स्वतःला अपूर्णांक करण्याची स्पर्धा लागली. एवढे अनर्थ स्वतःचा विचार स्वतःच करण्याची जबाबदारी टाळल्याच्या चुकीमुळे झाले. माणूस स्वतः लुळा झाला आणि त्यानं ईश्वर समर्थ केला. त्यानं दैवाला शक्ती दिली आणि स्वतः शक्तिहीन झाला. आणि या संदर्भांनी निर्माण केलेल्या भांडणांनी माणूस स्वतःलाच पारखा झाला. मग एक सुंदर स्वतंत्रता एक अंकितता झाली. एका प्रवाहाचं आटलेपणात रूपांतर झालं. एक अशरणता शरणागत झाली. एका साहसाचा भुसा झाला. एक बौद्धिक गर्जना मुकी झाली. माणूस नावाचं एक साहस पांगळं झालं.

अप्रस्तुताच्या नादी लागून माणसानं आपल्या शक्तीचा आणि वेळेचा अपार अपव्यय केला. त्यामुळं त्याचं खुद्द स्वतःकडंच दुर्लक्ष झालं. तोच त्याचा विषय असायला हवा होता. त्याचे इहजीवनातले प्रश्नच त्याला खरे प्रश्न वाटायला हवे होते. पण ते प्रश्न त्यानं बाजूला सारले. देव, ईश्वर असं कोणीतरी ते प्रश्न सोडवील या भ्रमात तो राहिला. त्याचे हे प्रश्न सोडवायला कोणी आलं नाही. कोणी येऊच शकत नव्हतं. कारण असं कोणी कुठं अस्तित्वातच नव्हतं आणि प्रश्नांची गर्दी वाढत गेली. एकेक माणूस अनेक प्रश्नांची विधानसभा झाला. त्यामुळं जीवनात माणसांपेक्षा प्रश्नांची संख्या अधिक झाली. कधीतरी ही प्रश्नांची भयावह गर्दी पाहून माणूस भांबावला. खूपदा जीवन म्हणजे भांबावलेल्या माणसांची गर्दी वाटते. कधी त्याच्या चुकीनं निर्माण केलेल्या चुकीच्या प्रश्नांची गर्दी वाटते. या गर्दीत आता माणूस पार दयनीय झालेला आहे. ही इहलोकाकडं पाठ फिरवण्याची शिक्षा आहे.

असं दिसतं, की माणूस जेव्हापासून आपल्या चुकांवर प्रेम करायला लागला तेव्हापासूनच तो स्वतःची हेळसांड करू लागला. तो त्याच्याच विरुद्ध वागायला लागला. तो त्याच्याच विरुद्ध बोलायला लागला आणि स्वतःलाच नाकारायला लागला. माणूस तेव्हापासून मग स्वतःला नाकारण्याची शिक्षा भोगतो आहे. या माणसाला कधीतरी स्वतःतील सूर्य विझविण्याची सवय लागली. या सवयीनंच मग त्याला स्वतःत अंधार निर्माण करण्याची विद्याही शिकविली. मग तो सहजच सूर्यद्रोह करीत राहिला. तो मग सहज स्वतःशीच द्रोह करीत राहिला. जीवनात, निसर्गात आणि खुद्द त्याच्याही मनात त्याच्याविरुद्ध जाणाऱ्या काही नकारशील गोष्टी होत्या. पण त्याच्या विचारानं जेव्हा त्याला बाजूला सारलं त्या क्षणापासून माणूस स्वतःच्याच विरोधात गेला. त्याच्याविरुद्ध तोच अशी लढाई त्यानंच निर्माण केलेल्या कल्पनांनी त्याच्या जीवनात सुरू केली. पुढं तो शरणागत म्हणून, अंकित म्हणून वा अपूर्णांक म्हणून यशस्वी झाला असेल कदाचित, पण माणूस म्हणून मात्र तो पराभूतच झाला. त्यानंच निर्माण केलेल्या काल्पनिक कथांनी त्याच्या वास्तवाचं महाकाव्य लुळपांगळं केलं.

इहवाद हे असं तत्त्वज्ञान आहे. ज्याला माणसाच्या वास्तवाचं महाकाव्य लुळपांगळं होणं अजिबात मान्य नाही. माणूस पराभूत कल्पनांचा बळी ठरू नये असं इहवादाला वाटतं.

इहवादाचा विषय माणूस आहे. त्याचा एकमेव विषय माणूसच आहे. म्हणून इहलोकाच्या विरुद्ध माणसानंच कल्पिलेला परलोक इहवादाला माणसाचा विरोधक वाटतो. इहलोकाची माणसाला उपकारक अशी निर्मिती करण्याच्या प्रक्रियेमध्ये परलोक खलनायकाचं काम करतो. म्हणून इहवाद माणसाला या परलोकाच्या विघातक मोहापासून मुक्त करण्याचं आंदोलन होतो.

इहवाद किंवा सेक्युलॅरिझम हे बुद्धिवादाचंच दुसरं नाव आहे. इहवाद माणसाला विज्ञाननिष्ठेचे पंख देतो. आणि उजेडाच्या गगनात भराऱ्या घ्यायला लावतो. माणसांमधील समतोल संबंधांची लागवड करायला लावतो. जडवादाची भावभूमी ही इहवादाची कर्मभूमी आहे. माणसाला स्वयंप्रकाशित, स्वयंशासित आणि स्वावलंबी करणं हा इहवादाचा वैश्विक जाहीरनामा आहे. इहवादाचं कळकळीचं सांगणं माणसाला असं आहे, की हे माणसा तू अत्तप्रभ हो. अत्तसूर्य हो. तू मुक्तमनस्क हो. तू कोणाचीही अधीनता पत्करू नकोस. असं झालं तर तुला माणूस या मर्यादेत राहण्याची गरज पडणार नाही. आणि तूच स्वतःभोवती तयार केलेल्या मर्यादा तुला अमर्याद होऊ देणार नाहीत. तुझ्याच अर्थपूर्णतेची विहीर तुला कायम उपसत राह्यला हवी आहे, तेव्हा निरर्थकाचे उकिरडे पुनःपुन्हा कशाला चाळून पाहण्यात स्वतःला बरबाद करतो आहेस किंवा कुठलंही सत्त्व असण्याची अजिबात शक्यता नसलेली फोलं पुनःपुन्हा आणि हजारो वर्षे कशाला पाखडतो आहेस? या सर्व पोकळ उद्योगात पडून स्वतःला कशाला पोकळ करून घेतो आहेस? माणूस एकदा स्वयंप्रभ झाला, की त्याच्या या प्रभेचा गुणाकार होतो किंवा बेरीज तर होतेच होते. म्हणून तू स्वयंनिर्भर हो. तू स्वयंनिर्भर झालास, की तुझ्या प्रभेला सगळं अंतराळ कवेत घेणाऱ्या फांद्या येतील. अजून अंधारानं लपवून ठेवलेले अवकाशाचे अनेक कानेकोपरे तुझ्या या उजेडाच्या फांद्यांच्या प्रतीक्षेत आहेत. देव, परलोक, दैव अशी अनेक आभासगृहं तू स्वतःला लपवण्यासाठी निर्माण केलीस, पण या आभासगृहांनी तुझ्या जीवनात तुरुंगांचीच भूमिका केली. या सर्वांनी तुझा शक्तिसंकोचच केला.

इहवाद माणसाला हे कळकळीनं सांगतो आहे आणि त्याच्या पूर्णप्रभतेची हमीही त्याला देतो आहे. आणि इहवादाची नीती ही माणसाच्या पूर्णांकाची नीती आहे. तीच त्याच्या पूर्णप्रभतेची आणि संपूर्ण मानवी प्रतिष्ठेची अजिंक्य नीती आहे. तिला स्वतःची ताकद आहे. ती सौहार्दपूर्ण मानवी संबंधांच्या सतत रचनेची आणि पुनर्रचनेची नीती आहे.

धर्मांच्या मूलतत्त्ववादी नीतीला म्हणजे धर्माला बलदंड करणाऱ्या आणि माणसाला दुर्बल करणाऱ्या नीतीला इहवादात कुठंही थारा नाही. इहवाद ही स्वतःच श्रेष्ठ मानवी नीती आहे. बुद्धिवादाची नीती कोणती वा विज्ञाननिष्ठेची नीती कोणती, असे अज्ञानाची जाहिरात करणारे प्रश्न मूलतत्त्ववादी विचारतात. त्यांना हे सांगितलं पाहिजे, की विज्ञाननिष्ठा हीच खुद्द अत्यंत सर्जनशील आणि नवनव्या उजेडाची सतत नवनवी पालवी येणारी नीती आहे. गवसलं ते अंतिम नाही. त्याची सतत तपासणी करा. त्यातील उणिवा लक्षात घ्या. आणि समर्थ होऊन पुढे समर्थ पावलं टाकत राहा. या प्रक्रियेशी एकनिष्ठ राहा. ही जीवनाच्या नवनिर्मितीचीच नीती आहे. ही जीवनाला स्वयंप्रकाशित करणारीच नीती आहे. माणसांच्या जीवनातील अंधाराच्या जागा उजळत जाणारीच ही नीती आहे आणि बुद्धिवाद ही सुद्धा स्वतःच एक उच्चकोटीची नीती आहे. बुद्धिवाद ईश्वर, धर्म वा परलोक मानीत नाही, याचा अर्थ या सर्वांशी संबंधित विषमतेची समाजरचना त्याला अमान्यच आहे असा आहे. बुद्धिवादाला ईश्वर वा धर्म मान्य नसतो याचा अर्थ त्यांच्या अनुषंगाने निर्मिलेला परलोकधार्जिणा समाज वा त्यातील माणसांमधील असमतोल संबंधही त्याला मान्य नसतात. जात, धर्म, परलोक आणि त्यांच्याशी संबंधित सर्वच अंधश्रद्धा बुद्धिवादाला मान्यच नसतात. बुद्धिवाद म्हणजे विवेक किंवा विवेकदृष्टी. या विवेकदृष्टीला कधीही चुकीची गोष्ट बरोबर वाटणार नाही. ही दृष्टी दुर्गंधीला सुगंध म्हणणार नाही. आणि तिला विघातकता कधीही विधायकता वाटणार नाही. अन्याय कधी न्याय वाटणार नाही, ही दृष्टी पारतंत्र्याला स्वातंत्र्य मानणार नाही. द्वेषाला करुणा आणि शोषणाला समाजवाद मानणार नाही.

विज्ञाननिष्ठ होणं वा बुद्धिवादी होणं म्हणजे इहवादी होणंच असतं. विज्ञाननिष्ठा हे इहवादाचंच मार्गदर्शक तत्त्व असतं. खरं म्हणजे विज्ञाननिष्ठेची प्रक्रिया ही बुद्धिवादाचीच प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचा परिपाक इहवादात झालेला आहे. धर्म वा ईश्वर या गोष्टी सत्ताधारी वर्गांची बाजू घेऊन सामान्यांची मती सपाट करतात. समाजात निराशा, पुरुषवर्चस्वाची व्यवस्था, एखाद्या भांडवलशाहीच्या वा सरंजामशाहीच्या वर्चस्वाची व्यवस्था आकाशातून पावसासारखी पडत नाही. भोगवाद, बलात्कारी वृत्ती, भ्रष्टाचारी वृत्ती, शोषकवृत्ती वा अंधश्रद्धा या गोष्टी विकृत आणि हिंस्र समाजरचनेतूनच जन्माला येतात. त्या वरून पडणाऱ्या उल्का नसतात. वर्चस्वाच्या तृष्णेतून उफाळून येणारे हे आगीचे प्रवाहच समाजाला जाळत समाजभर पसरतात. तेव्हा या अनीतीचा ईश्वर, धर्म या सर्व गोष्टी असताना कसा होतो? हे सर्व अनीतीचे खेळ असतात आणि या खेळांना परलोकाचे हवाले मान्य करून नीती म्हणा एवढीच ईश्वरवाद्यांची वा अध्यात्मवाद्यांची भूमिका असते.

काल्पनिक ईश्वरासाठी, स्वर्गासाठी नीती म्हटलं, की इहलोकासाठी तिचा उपयोग नसतो. तिचं प्रयोजनच वेगळं असतं. ती भीतीपोटीही वावरते. दबावाखाली राहते. अशा नीतीचा उपयोग ऐहिक वास्तवाला होत नसतो. नीती माणसांतील सौहार्दाशीच संबंधित असायला हवी. इहवादाची नीती अशी असते. मीही आणि पुढला माणूसही सतत उगवत राहणं, सतत प्रकाशित होत राहणं हे या नीतीचं महत्त्वाचं लक्षण आहे. ही नीती माणसासाठी आहे. स्वयंप्रभ माणसांची, स्वयंप्रभ माणसांसाठी, स्वयंप्रभ माणसांच्या बौद्धिक चारित्र्यातून उगवलेली ही नीती आहे. ती इहवादी नीती आहे. असं म्हणा, की ती नास्तिकांचीही नीती आहे. सतत उज्ज्वल माणूस असणारांची ही साधी सौहार्दाची नीती आहे.

ही इहवादाची नीती ईश्वरच मानीत नाही म्हणून प्रार्थनेच्या, शरणागतीच्या, चमत्कारांच्या, चिरंतनत्वाच्या, अंतिमत्वाच्या पावित्र्याच्या वा भक्तीच्या रंजक आणि भ्रांत पसाऱ्याला या नीतीत कुठंही स्थान नाही. इहवादाला अभिप्रेत जीवनाची रचना ही निखळ मनुष्यत्वाचीच वा तर्कशुद्धतेचीच वा विवेकाचीच रचना असते. जीवनाचा

गुरुत्वमध्य ईश्वर आहे. परलोक नव्हे. नियती वा दैव नव्हे. जीवनाचा गुरुत्वमध्य माणूसच आहे, निखळ माणूस. दैववादामुळं, भ्रमामुळं, अगतिकतेमुळं त्याच्यावर थापले गेलेले शेंदराचे थर तेवढे खरवडून काढायला हवे आहेत. तो मूळ एकसंध, नितळ आणि चौकटींनी न गिळलेला माणूस इहवादाच्या नजरेत आहे.

जीवनाची बाकीची आणि चुकीची केंद्रं विचलित, उद्ध्वस्त वा हास्यास्पद करून माणसाचं महानायकत्व, त्याचं गुरुत्वमध्यत्व इहवादाला जबाबदार जीवनासाठी, सर्जनशील जीवनाच्या भल्यासाठी प्रस्थापित करायचं आहे. माणसाच्या पूर्ण प्रकाशनासाठी, त्याला स्वयंप्रभ वा स्वयंशासित करण्याच्या मुद्यावर इहवादाला कोणतीही तडजोड अजिबात मान्य नाही. अशी तडजोड मान्य नसलेल्या इहवादाच्या बुलंद पावलांनी जीवनाला इथपर्यंत आणलं. जीवनाचा आजचा पिसारा हा इहवादी प्रज्ञाप्रतिभांचाच पिसारा आहे. ही बाब सर्वांनीच काळजीपूर्वक लक्षात घ्यावयाची आहे.

सेक्युलॅरिझम हा शब्द पाश्चात्त्य असला तरी त्याच्यातील आशयाची लढावू परंपरा भारतात सिंधू संस्कृतीपासूनची आहे. मध्ययुगाच्या समाप्तीनंतर युरोपात धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्यातील संघर्षाचा परिणाम म्हणून सेक्युलॅरिझमची चळवळ जन्माला आली आणि या दोन्ही सत्तांनी आपल्या अधिकारकक्षा आखून घेतल्या. भारतात सिंधू संस्कृतीच्या काळापासून श्रमण-संस्कृती होती. ती इहवादी होती. लोकायत आणि बुद्ध यांची तत्त्वज्ञानं इहवादीच होती. यांपैकी कोणीही धर्माची स्थापना केली नाही. उलट त्यांनी त्या काळच्या धर्माच्या विरोधात आणि त्यानं पुरस्कारलेल्या समाजसंस्थेच्या विरोधात बंडच पुकारलं. ही भारताची निधर्मी परंपराच होती. शिवाय या परंपरेची समतेची नीती आहे. सेक्युलॅरिझम किंवा इहवाद आपण भारतीयांनी पाश्चात्त्यांकडून घेण्याची काहीही गरज नाही. पाश्चात्त्यांच्याही आधी भारतानं इहवादी तत्त्वज्ञानाला, इहवादी जीवनशैलीला जन्म दिला. सॉक्रेटिस वगैरे तर बुद्धाच्या नंतरच्या काळात झाले. पण सॉक्रेटिसपूर्व काळातील तत्त्वज्ञांनाही श्रमणसंस्कृतीसारखे, बुद्धासारखे वा लोकायत यांच्यासारखे इहवादी तत्त्वज्ञान आणि चैतन्यवादाचा तात्त्वज्ञानिक संघर्ष पाश्चात्त्यांपूर्वी भारतातच झाला. आपण पाश्चात्त्यांच्या संसर्गानं सर्वच गोष्टींचे प्रारंभ पाश्चात्त्य जगात झाले असं मानतो. ही गोष्ट इकडील मूलतत्त्ववाद्यांना अतोनात मदत करणारीच ठरते. मग हे पाश्चात्त्य आहे म्हणून आपण त्यापासून दूर राहिलं पाहिजे हे फक्त समाजरचना बदलू नये यासाठी म्हटलं जातं.

वास्तव मात्र वेगळं आहे. ज्या मूल्यांना आधुनिक मूल्यं म्हटलं जातं आणि जी पाश्चात्त्य आहेत असं म्हटलं जातं आणि अभारतीय म्हणून ज्यांना नकार दिला जातो ती मूल्यं पाश्चात्त्यांपूर्वी हजारो वर्षं भारतात होती, श्रमणसंस्कृती, लोकायत आणि बुद्ध यांच्या तत्त्वज्ञानात होती याकडं सोयीस्कर दुर्लक्ष केलं जातं. इहवाद आणि आधुनिक मूल्यं यांच्यात तफावत नाही. किंबहुना आधुनिक मूल्यं हेच इहवादाचं तत्त्वज्ञानरूप आहे. याचा अर्थ आधुनिक मूल्यांची बैठक असलेला इहवाद भारतातील श्रमण, लोकायत आणि बुद्ध यांनी जगाला दिला असंच म्हणायला हवं. पण या भारतीय इहवादाला पुरुषवर्चस्ववाद्यांना, वंशश्रेष्ठत्ववाद्यांना, अध्यात्मवाद्यांना आणि अलौकिकाचं नाव सांगत लौकिकात साधनवंचित गोरगरिबांचं शोषण करणारांना नकार द्यायचा असतो तेव्हा ते या गोष्टी पाश्चात्त्य असल्याचा खोटा प्रचार करतात. असा प्रचार करून ते आपलं वर्चस्व सुरक्षित करण्याचा अपयशी प्रयत्न करतात. याचं कारण भारतात जन्माला आलेला इहवाद मूलतत्त्ववादी नाही; तो गतिमान आणि परिवर्तनशील आहे. या इहवादाला सर्वधर्मसमभावात कोंबता येत नाही. आणि त्याला धर्मनिरपेक्षताताही म्हणता येत नाही. लोकांनी आपापल्या व्यक्तिगत जीवनात आपापले धर्म पाळावेत; शासन मात्र कोणत्याच धर्माचं नसतं, एवढाच धर्मनिरपेक्षतेचा अर्थ आहे. हा अर्थ

स्वीकारल्यामुळेही खूप मोठा गोंधळ माजतो. कारण व्यक्तिगत पातळीवर धर्म पाळणारी माणसंच शासन चालवायला जातात. कितीही म्हटलं तरी शासनाला धर्मनिरपेक्ष होणं अवघड होऊन बसतं, पण तरीही धर्मनिरपेक्षता ही पायरी आहे आणि पायरी ही ओलांडण्यासाठीच असते. निधर्मीपणाकडं जाण्यासाठी धर्मनिरपेक्षतेची पायरी ओलांडली जाण्याची गरज असतेच. असा इहवाद जगात खूप ठिकाणी आहेच; पण त्या इहवादाची, या निधर्मीपणाची सुरुवात वैदिक, ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मांच्या शेंकडो-हजारो वर्ष आधी भारतात या इहवादाचा मूळ जन्मदाता भारत आहे. संपूर्ण मानवी प्रतिष्ठेच्या या महाप्रकल्पाचा जन्म भारतात झालेला आहे. इहवाद हे माणसाच्या संपूर्ण सौंदर्याचं, माणसाच्या संपूर्ण शक्यतांच्या संपूर्ण प्रकाशनाचं सौंदर्यशास्त्र आहे. हे तत्त्वज्ञान 'माणूस' या शब्दाला जगातला सर्वात सुंदर शब्द मानतं. 'माणूस' नावाचा हा सुंदर शब्द अधिकाधिक सुंदर करण्यासाठी इतर सर्वच शब्द प्रयत्न करतात. असं करून हे शब्दही स्वतःला अर्थपूर्ण, कृतार्थ आणि सुंदर करून घेतात.

इहवाद ही जागतिक संपत्ती आहे. सूर्यासारखा तो जगातल्या सर्वांसाठी आहे. ही सर्वांसाठी मुक्त असलेली, सर्वांचीच समान मालकी असलेली मानवी सौहार्दाच्या उजेडाची वैश्विक बँक आहे. या सौहार्दाच्या उजेडाच्या महोत्सवाकडं कुणीही पाठ फिरवू नये. जगातील प्रत्येकाच्याच जीवनात मनोरमता फुलवणारं हे झाड कोणी तोडून तर नयेच; पण त्याकडं पाठही फिरवू नये. विश्वाच्या मनुष्यमयतेचाच तो अपमान ठरेल आणि मनुष्यमयतेचा असा अपमान कोणीही करू नये.

'सकाळ, सप्तरंग'च्या सौजन्याने

•••

# सत्तांतर आणि निष्ठांतर

*सुरेश द्वादशीवार*

राजकारण माध्यम

'राजा बोले आणि दळ हले' अशी एक म्हण आपल्यात आहे. पण ती तेवढीच खरी नसावी. आपल्या देशात राजा बोलू लागण्याआधी नुसते दळच नव्हे, तर सारे काही हलू लागते आणि हलणारे सारे स्वतःला राजाच्या इच्छेनुरूप बदलूही लागते. काँग्रेस पक्षाचा पराभव २०१४ च्या निवडणुकीत होईल याचा अंदाज येताच त्या पक्षातील अनेकांच्या निष्ठा पातळ झाल्या आणि ते पक्षत्यागाच्या तयारीला लागले. त्यांच्यातील अनेकांनी पक्षत्यागाआधी भाजपची तिकिटेही पदरात पाडून घेतली. निवडणुकीचा निकाल आल्यानंतर अशा निष्ठांतरवाल्यांचा मोठा ओघच सुरू झाल्याचे देशाला दिसले. इंद्रजीत सिंह, ओमप्रकाश यादव, सुशीलकुमार सिंह, ब्रिजभूषण शरणसिंह, जगदंबिका पाल, धरमवीर सिंह, अजय निशाद, संतोषकुमार, मेहबूब अली कैसर, अशोककुमार डाहोर, विद्युतभरण महतो, कर्नल सोनाराम चौधरी आणि सत्पाल महाराज हे आज लोकसभेत भाजपच्या बाकावर बसणारे खासदार या निवडणुकीपूर्वी काँग्रेसमध्ये होते. ही यादी इथेच संपत नाही. नंतरच्या विधानसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेस सोडणाऱ्यांची यादी याहून

मोठी आहे. या यादीत जयंती नटराजन या अखेरच्या दिसत असल्या, तरी त्यांच्यापाशी तो शेवट होईल याची खात्री नाही.

मात्र हे राजकारणातच झाले, असे नाही. न्यायासन, प्रशासन, प्रसिद्धिमाध्यमे आणि स्वतःला समाजसेवी म्हणवून घेणाऱ्या संघटना या साऱ्यांतच ते झाले. देशाचे सरन्यायाधीश एच.एल. दत्तू हे संविधानाने घालून दिलेली सत्तेच्या विभाजनाची मर्यादा विसरले आणि एका जाहीर सभेत नरेंद्र मोदींना चांगुलपणाचे प्रशस्तिपत्र देऊन मोकळे झाले. अमेरिकेच्या एखाद्या न्यायमूर्तीने ओबामांना असे प्रमाणपत्र दिले असते, तर तिथल्या विधिमंडळात (सिनेट) त्याच्याविरुद्ध महाभियोगाचा खटलाच दाखल झाला असता. पण हा भारत आहे आणि त्यात सारे काही चालणारे व खपणारे आहे. त्यात न्या. दत्तू यांच्या वर्तनाची प्रशंसा करणारेही असावे हे त्याचे एक उदार वैशिष्ट्यही आहे. यापूर्वीच्या डॉ.मनमोहनसिंग सरकारच्या दुसऱ्या कारकिर्दीत सर्वोच्च न्यायालयाचे काही न्यायाधीश सरकारच्या कारभारावर भयंकर संतापलेले दिसले. त्याकाळात ते केवळ न्यायदान करूनच थांबले नाहीत, प्रशासनाच्या चांगल्या-वाईटावर त्यांनी भाष्ये केली. सरकारने घ्यावयाचे निर्णय स्वतः घेतले. टू-जी स्पेक्ट्रम घोटाळा किंवा कोळसा खाणींचे परवाने देण्याच्या सरकारच्या अधिकारावर त्यांनी टाच आणली आणि त्याही पुढे जाऊन सरकारवर नाकर्तेपणाचा ठपकाही उमटविला. त्यातल्या एका माजी संतप्ताला आताच्या सरकारने राज्यपालपद दिले आणि न्या. दत्तू यांच्यासाठीही ते तसे काही करील, याविषयी कोणी शंका बाळगण्याचे कारण नाही. आपल्या घटनेने न्यायालयांना स्वायत्तता दिली आहे. त्यांच्या कामकाजाची चर्चा करणे वा त्यांच्यावर टीका करणे मंत्रिमंडळाएवढेच संसदेलाही वर्ज्य आहे. असे असतानाही सत्तेचा बदललेला चेहरा पाहून आपली न्यायालये त्याच्या पुढ्यात रांगू लागली असतील, तर तिच्या मागे उभे राहणे अपेक्षित असलेल्या लोकमानसाच्या दुबळेपणाचाही आपल्या घटनेएवढाच कधी तरी विचार करावा लागणार आहे.

आपली न्यायालये तशीही आरंभापासूनच सत्ताधार्जिणी राहिली आहेत. अगदी घटनेचा अर्थ लावतानाही तो सत्ताधाऱ्यांना अनुकूल असा लावण्याची त्यांची परंपरा राहिली आहे. परवापर्यंत काँग्रेसबाबत सौम्य भूमिका घेणारी न्यायालये आता भाजपानुकूल भूमिका घेताना दिसत आहेत. गुजरातमध्ये झालेल्या दंगलीच्या सर्व आरोपांबाबत त्यांनी भाजपच्या वरिष्ठांना स्वच्छतेची प्रमाणपत्रे आता दिली आहेत. जामिनावर असलेली आणि खुनापासून खंडणीखोरीपर्यंतचे आरोप शिरावर असलेली माणसे या न्यायालयांना ‘चांगली व साळसूद’ असल्याचे आता वाटू लागले आहे. अशी न्यायालये सामान्य माणसांना न्याय देतील, असा त्यांच्याविषयीचा विश्वास जनतेने तरी मग कसा बाळगायचा?

आपला देश मोठ्या मनाचा आहे आणि त्याला विस्मरणाचे चांगले वरदानही आहे. अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा गणराज्यदिनाच्या सोहळ्याला प्रमख पाहुणे म्हणून आले आणि त्यांनी एका झटक्यात भारत व अमेरिका यांच्यात झालेल्या अणु करारातील सारे अडसर बाजूला सारले. त्यांच्या त्या कृतीचे देशाने स्वाभाविकपणेच कौतुक केले आणि ते करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आर्जवी वृत्तीचाही त्याला अभिमान वाटलेला दिसला. तो व्यक्त करताना ज्याची स्थिती सर्वाधिक अवघड झाली, तो पक्ष मात्र प्रत्यक्ष पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाच आहे. भारताने अणुबाँबचा पहिला स्फोट १९७४ मध्ये केला. त्यानंतर लागलीच अमेरिकेसह सगळ्या अण्वस्त्रधारी व अणुइंधनधारी देशांनी त्यावर निर्बंध घालून त्याचा अणुइंधनाचा पुरवठा बंद केला. का आण्विक बहिष्कार मागे घेतला जावा आणि त्याच्या "शांततेसाठी अणू" या कार्यक्रमासाठी तरी तो पुरवठा सुरू व्हावा, यासाठी राजीव गांधींच्या सरकारपासून

अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारपर्यंत साऱ्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. या प्रयत्नांना यश आले ते डॉ. मनमोहनसिंग यांच्या पहिल्या कारकिर्दीत. दि.७ व ८ जुलै २००८ या दोन दिवसांत जपानच्या होक्काइडो या बेटावर झालेल्या जी-८ देशांच्या परिषदेला भारत एक निमंत्रित देश म्हणून उपस्थित होता. त्या वेळी डॉ. मनमोहनसिंग व अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉर्ज बुश यांच्यातील चर्चेत भारतावरील अणुइंधनाच्या पुरवठ्यावरील बंदी मागे घेण्याचा निर्णय घेतला गेला. या निर्णयाचे तेव्हा भारतात प्रचंड स्वागतही झाले. परंतु त्या यशाचे श्रेय डॉ.मनमोहनसिंग आणि त्यांच्या सरकारला मिळू नये, म्हणून भाजपने त्या करारालाच तेव्हा विरोध केला. त्यासाठी अमेरिकेला परंपरागत विरोध करणाऱ्या डाव्या पक्षांशी हातमिळवणी करण्यापर्यंत त्याची मजल गेली. त्याआधी वाजपेयी यांच्या सरकारने (म्हणजे आपल्याच पक्षाच्या सरकारने) अशा करारासाठी प्रयत्न केल्याचाही त्याला तेव्हा विसर पडला. त्या विस्मृत पण कमालीच्या आक्रोशकारी राजकारणाचे नेतृत्व लालकृष्ण अडवाणी यांनी तेव्हा केले. सन २०१४ च्या निवडणुकीत पूर्वीचे विरोधक सत्ताधारी बनले आणि त्यांनीच डॉ.मनमोहनसिंग यांचा अमेरिकेशी झालेला करार पूर्णत्वाला नेऊन त्याचा आनंद परवा साजरा केला. तो करणाऱ्यांत अडवाणीच तेवढे नव्हते. बाकीचे सारे झाले-गेले विसरून या कराराचा जयजयकार करताना दिसले. गंमत म्हणजे, या खांदेपालटाचे देशालाही फारसे काही वाटल्याचे दिसले नाही. जणू असे होणार, हे त्याने गृहीतच धरले होते. राजकीय श्रेयासाठी देशहित बाजूला ठेवणाऱ्यांना क्षमा करण्याएवढे हे विस्मरण उदार म्हणावे असेच आहे. अशा वेळी आपल्याला पडणारा प्रश्न हा की, अमेरिका व भारत यांच्यातील कराराची आज भलावण करणारी भाजपची नेतेमंडळी त्यांची २००८ ची भूमिका खरोखरीच विसरली असतील काय? की सत्ता बदलली की सारेच बदलते, हा समज त्यांनीही अंगी बाणलेला आहे? प्रशासनात वरिष्ठ जागांवर असलेले किती अधिकारी लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी, तोपर्यंत त्यांच्यात न दिसलेल्या राजकीय निष्ठा दाखविताना दिसले---हा प्रश्नही इथे विचारण्याजोगा आहे. कॅगचे प्रमुख विनोद राय यांनी निवडणुकीपूर्वी प्रत्यक्ष पंतप्रधानांसह त्यांच्या सरकारातील अनेक ज्येष्ठ मंत्र्यांवर भ्रष्टाचारसदृश आरोप केले. या माणसांनी आपल्या खात्याच्या कारभारात नको तसा हस्तक्षेप केला, असे त्या सरकारच्या अखेरच्या दिवसांत त्यांनी देशाला ऐकविले आणि निवडणुकीनंतर ‘नॉट जस्ट  ॲन अकाउंटंट’ या नावाचे पुस्तक लिहून आपल्या नवनिष्ठाच त्यांनी मोदी सरकारच्या चरणी अर्पण केल्या. रणजित सिंग या सीबीआयच्या प्रमुखाची गोष्टही नेमकी अशीच आहे. या इसमाने आपल्या बदलत्या निष्ठांसाठी सर्वोच्च न्यायालयासमोर दिलेल्या जबान्याच बदललेल्या आपण पाहिल्या. या दोघांची वर्णी अजून कुठे लागली नसली, तरी ती यथावकाश लागलेली आपण पाहणारही आहोत. आपल्या माधवराव गोडबोल्यांनीही नेहरूंपासून मन‘मोहनसिंगांपर्यंत सरकारचे वाभाडे काढणारे ‘द गॉड हू किल्ड’ आणि ‘गुड गव्हर्नन्स नेव्हर ऑन इंडियाज रडार’ या नावाची पुस्तके लिहिली. मात्र त्यासाठी गोडबोले यांच्या पूर्वीच्या मौनालाच तेवढे जबाबदार धरता येते. त्यांच्या निष्ठा पूर्वीही सगळ्यांना ठाऊक होत्या. आता त्या छापील स्वरूपात आल्या, एवढेच. प्रशासन ही स्थिर व्यवस्था आहे. राजकीय सत्तांतरानंतरही ती कायम राहणारी आहे. या व्यवस्थेतील लोकांनी त्यांच्या राजकीय प्रमुखांच्या आज्ञेबरहुकूम व धोरणानुसार वागले पाहिजे, हे समजण्याजोगे आहे. मात्र नव्या निष्ठा जोरात सांगण्यासाठी जुन्या सत्ताधाऱ्याना नावे ठेवणे, हा प्रकार गैर व लोकशाहीत न बसणारा आहे. प्रकाशचंद्र पारख या कोळसाखात्याच्या सचिवाची निष्ठा २०१४ पर्यंत प्रशासनावर होती. आता त्याही सत्पुरुषाचा विवेक जागा झाला असून कोळसा खाणींची परमिटे वाटण्यात आपण कसे नव्हतो आणि तो सारा व्यवहार राजकीय सत्ताधाऱ्यांनीच कसा केला, ते रंगविणारे ‘क्रूसेडर ऑर कॉन्स्पिरेटर? कोलगेट ॲन्ड अदर ट्रुथ’ या नावाचे पुस्तक त्याने लिहिले आहे. मात्र यातले

सर्वांत संतापजनक उदाहरण संजय बारू या डॉ.मनमोहनसिंग यांच्या वृत्तसचिवाचे आहे. डॉ.मनमोहनसिंग हे मला आपला मुलगा मानत, असे तोवर सांगणाऱ्या या संजयाने ऐन निवडणुकीच्या तोंडावर आपल्या आठवणींचे एक पुस्तक 'द ॲक्सिडेंटल प्राईम मिनिस्टर' प्रकाशित करून डॉ.मनमोहनसिंग यांच्या पाठीत खंजीर खुपसलेलाच देशाला दिसला. राजकारणातले असे एक उदाहरण के.नटवरसिंह यांचे आहे. नेहरू व गांधी या घराण्यांशी असलेल्या आपल्या संबंधांचे भुस्कुट मिरविणारा देशाचा हा माजी परराष्ट्रमंत्री कृष्णा हाथीसिंह आणि विजयालक्ष्मी पंडित या पं.नेहरूंच्या बहिणींना मावशी म्हणायचा. इंदिरा गांधींशी आपले घरगुती संबंध असल्याचे सांगायचा. सोनिया गांधींचा मार्गदर्शक म्हणून मिरवायचा. आता आपले आत्मचरित्र 'वन लाईफ इज नॉट इनफ' लिहून त्याने सोनिया गांधींचे आणि त्यांच्या राजकारणाचे वाभाडे काढण्याचेच कर्तृत्व दाखविले. हे पुस्तक निवडणुकीपूर्वी प्रकाशित करू नका, अशी विनंती त्यांना प्रत्यक्ष सोनिया गांधी व प्रियंकाने केल्यानंतरही त्यांनी ते प्रकाशात आणले. त्याच्या मोबदल्यात भाजपने त्यांच्या चिरंजीवाला राजस्थानात आमदारकीचे तिकीटही तत्काळ दिलेले दिसले.

देशातील प्रसिद्धिमाध्यमांचे घूमजाव याहून मजेशीर व उद्बोधक आहे. मनमोहनसिंग सरकारच्या अखेरच्या काळात जी माध्यमे त्याच्यावर तुटून पडताना दिसली, त्यांचे आताचे स्वरूप कसे आहे? तेव्हा ही माध्यमे सरकारला नुसता उपदेश करायची नाहीत; त्याला खडसावायची आणि आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून त्याची उलटतपासणी करायची. ती करताना आपल्या जवळच्या माहितीची सत्यासत्यता तपासून घेण्याचीही काळजी ती घेत नसत. त्या सरकारच्या काळातील कथित घोटाळ्यांचे आकडे फुगवून सांगताना आपल्या माहितीतील आकड्यांसमोर किती शून्ये लिहायची याचीही फिकीर ते बाळगत नसत. मग आदर्श घोटाळ्यातील जमीन महाराष्ट्र सरकारने कारगिलच्या युद्धातील विधवा स्त्रियांकडून हडपली असल्याचा शोध ते लावीत आणि द्रमुकच्या मंत्र्यांवरील घोटाळ्यांचे आरोप थेट पंतप्रधानांच्या दारावर नेऊन चिकटवीत. तशीही एके काळी डाव्यांच्या प्रभावाखाली असलेली ही माध्यमे नंतर उजव्या परिवाराच्या बाजूने गेलेली देशाला दिसली. सगळ्या चित्रवाहिन्यांच्या संघटनेवरील १७०० कोटींचा कर्जभार कोणा एका उद्योगपतीने २६०० कोटी रुपये देऊन उतरविला. परिणामी, त्याच्या ताब्यात गेलेली ही माध्यमे त्याने नव्या सरकारच्या व त्याच्या परिवाराच्या प्रसिद्धीला जुंपली. निवडणुकीपूर्वीच हे झाले. आताही या माध्यमांचे सरकारसमोरचे लोटांगण कायम आहे. शशी थरूरवर कोणताही आरोप पोलिसांनी अद्याप ठेवला नसला, तरी त्याचे दैनिक वाभाडे काढणारी ही माध्यमे गुजरातेतील गुन्हेगारांचे सारे अपराध आता विसरली आहेत. जन्मठेप आणि २५ ते २८ वर्षांच्या शिक्षा झालेले भाजपचे किती पुढारी सध्या जामिनावर आहेत याची त्यांना चौकशी करावीशी वाटत नाही. खुनापासून खंडणीखोरीपर्यंतचे आरोप शिरावर असणारा एक पुढारी साऱ्या देशाला बोटावर कसे नाचवितो, ते त्यांना दिसत नाही. हिंदू स्त्रियांना पोरांचे कारखाने बनवायला निघालेली माणसे त्यांना संत व साधू वाटतात आणि नथुरामचे उदात्तीकरण करणाऱ्याविरुद्ध त्यांच्या लेखण्या सरसावताना दिसत नाहीत. चित्रवाहिन्यांवरील चर्चा एकतर्फी आणि आक्रोशवजा, तर बड्या वृत्तपत्रांचे स्तंभलेखनही एकारले झालेले दिसते. काँग्रेसवर टीका करताना धारदार होणारी ही माध्यमे झारखंडपासून पंजाबपर्यंत आपले पाठबळ गमावत असलेल्या भाजपबद्दल गप्प राहतात. ममता बॅनर्जी टीकेचा विषय होतात आणि पंजाबातला मजिठिया हा तेवढाच मोठा घोटाळा करणारा मंत्री या माध्यमांच्या नजरेतून सुटलेला दिसतो. अरविंद केजरीवालांचे अपक्वपण मोठे करून दाखविणारी माध्यमे किरण बेदींची पोरकट वक्तव्ये गंभीर करून दाखविताना दिसतात. ही यादी आणखीही वाढविता येईल. पण वानगीदाखल ही उदाहरणे पुरेशी आहेत... यातून झाले एकच--या माध्यमांची विश्वसनीयताच आता प्रश्नांकित झाली आहे. स्वतःला

स्वयंसेवी म्हणवून घेणाऱ्या संघटनांची (एनजीओ) स्थिती याहून वाईट आहे. मनमोहनसिंगांच्या अखेरच्या कार्यकाळात देशभर गहजब करणारी या संघटनांतली प्रसिद्धीबाज माणसे एकाएकी भूमिगत झाल्यासारखी अदृश्य झाली आहेत. भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलन करणारे दिसेनासे झाले आहेत. पर्यावरणाच्या रक्षणासाठी प्राणत्याग करायला तयार असणारेही गडप झाले आहेत. मनमोहनसिंग सरकारने कोणतीही योजना हाती घेतली की, ती पर्यावरणाचा नाश करणारी कशी आहे, हे जिवाच्या आकांताने ओरडून सांगणारे सगळे जण नव्या सरकारच्या तशाच योजनांची आरती करायला सामोरे झालेले किंवा गप्प झालेले दिसताहेत. त्या काळात या लोकांनी बॉक्साईटच्या खाणी बंद पाडल्या. कोळशाच्या खाणींविरुद्ध वृत्तपत्रांतून आघाड्या उघडल्या. त्या अपयशी झाल्या, तेव्हा ही माणसे न्यायालयांचे दरवाजे ठोठावताना दिसली. त्यांनी नियामगिरीला टाळे ठोकले, पॉस्को योजनेला विरोध केला आणि ब्रह्मपुत्रा विद्युत प्रकल्पाच्या मार्गात अडसर उभे केले. कुडनकुलम होणार नाही यासाठी त्यांनी पावले उचलली आणि जैतापूर रोखायलाही ते पुढे झालेले दिसले. नर्मदा धरणाची उंची एकाही इंचाने वाढू देणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतली आणि बियाण्यांच्या सुधारलेपणासाठी वापरायच्या जैविक तंत्रज्ञानाविरुद्ध युद्ध पुकारले. गंमत म्हणजे, या साऱ्या गहजबाला तेव्हा माध्यमांएवढीच शहाण्या म्हणविणाऱ्या वर्गांनीही साथ दिली. या संघटनांचा आक्रोश त्या काळात कानठळ्या बसविण्याएवढा मोठा होता. परिणामी, लोकच त्याला नंतर कंटाळताना दिसले व पुढे-पुढे त्यांच्या खरेपणाविषयीच जनतेच्या मनात संशय उत्पन्न होत गेला. त्यातून अशा संघटनांपैकी अनेकींच्या पदरात दर वर्षी नियमाने पडणारी विदेशी पैशाची भरही त्या काळात उघड झाली. सन २००५ ते २०१० या पाच वर्षांत या संघटनांनी असे ५५ हजार कोटी रुपये विदेशातून कमावले आणि स्वदेशात नव्या योजना येणार नाहीत याची काळजी घेत विदेशांसाठी इथली बाजारपेठ खुली ठेवण्याची व्यवस्था केली... नंदन नीलेकणींचे उदाहरण या संदर्भात नुकतेच एका नियतकालिकाने देशासमोर आणले आहे. त्या भल्या माणसाने परिश्रमपूर्वक बनवून देशाच्या हाती दिलेल्या आधार कार्डाला तेव्हा आक्षेप घेणाऱ्या स्वयंसेवी संघटना त्याच कार्डाचा जास्तीचा आधार घेणाऱ्या आताच्या सरकारविरुद्ध ब्रही काढताना दिसत नाहीत... अशा वेळी आपल्यातील समाजसेवी म्हणविणाऱ्यांच्या समाज- निष्ठेविषयीचीच शंका मनात येऊ लागते. असो. सरकार दुबळे झाले की न्यायालये, माध्यमे व समाजातील बोलका मध्यमवर्ग बलवान होतो, असे म्हणतात. सरकारात बदल झाला आणि त्याजागी जास्तीची गरजणारी माणसे आली की, या बोलक्यांची बोलणीही मंदावत जातात. सरकार मजबूत असणे चांगले असते. मात्र या बदलाच्या वाटेवर ज्यांनी आपली विश्वसनीयता गमावली, त्यांची दयनीयता हास्यास्पद आणि केविलवाणी होऊन जाते. सरकारातील बदल हा लोकशाहीच्या प्रक्रियेचा भाग आहे. मात्र त्या बदलासोबत साऱ्यांना बदललेले पाहावे लागणे हे केवळ आपले राष्ट्रीय वैशिष्ट्य आहे. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, जपान आणि इतरही लोकशाही देशांतली सरकारे निवडणुकीत बदलतात; पण तिथली न्यायव्यवस्था, प्रशासन, माध्यमे आणि सामाजिक संस्था आपापली प्रकृती जपत कायम राहतात. आपल्या लोकशाहीतल्या या व्यवस्थांची प्रकृती एक तर जास्तीची नाजूक असावी किंवा ती मुळातच स्थिर नसावी.

'साधना साप्ताहिक'च्या सौजन्याने

sdwadashiwar@gmail.com

•••

# दाटून येते सारे...

*मेधा पाटकर*

चळवळ संघटन खाउजा विस्थापित

आयुष्याचा मार्ग हा अनेक वळणे घेतच पुढे जात असतो. ज्यापर्यंत पोहोचायचे असते, ती 'मंजिल' अनेकदा एकच नसते. अनेक व बदलत्या ध्येयांच्या क्षितिजाकडे आपले लक्ष केंद्रित करत असेल तरच आपलीही वळणांवरची कसरत तोल न जाऊ देता, चालत राहायला हरकत नसते. माझेच नव्हे, प्रत्येकाचेच आयुष्य असे वळणवाटांनी भरलेले व भारलेले असते. त्यांच्याकडे मागे वळून पाहिल्यास सुखदु:खाची चढाओढ तर जाणवतेच परंतु त्या पल्याड आपली पावले धावत राहिल्याचे मोलही उमजते. एखाद्या वळणावर काही निसटलेले जाणवते तर काही वेळा एखादी झेप पहाड चढून जाणारी ठरली आहे, असे मिश्र संकेत मिळतात. या साऱ्याचा आढावा घ्यायचा तो इतरांसाठीच नव्हे, स्वत:साठीही, पुढचा मार्ग आखण्यासाठीही !

माझ्या आयुष्याला खरे तर एखादे ग्लॅमरस वळण असे क्वचितच मिळाले. वळणाची सुरुवात जरी एखाद्या भावुक घटनेने सुचली असली तरी प्रत्यक्ष वाटचाल मात्र बऱ्याच विचारांती झाली असेच जाणवते. लहानपणचा अनुभव, बसस्टॅण्डवरील भिकाऱ्याला पैसाही न देता आईने घाईने हात खेचल्यामुळे पुढे जावे लागल्याने, जसा गरिबांशी जोडण्यास कारणीभूत ठरला, तसेच शाळेत शिकताना दर रविवारी गरीब-मध्यमवर्गीय मुलांसाठी 'कथामाला' चालवण्यापासून ते त्यांची छोटी-मोठी कामे करण्यात एक वेगळीच ऊर्जा निर्माण व्हायची. उन्हाळी सुट्टीतील ग्रामीण शिबिरे 'बौद्धिक संपदा' देऊन जायची. त्या काळात दम घोटेस्तोवर विहीर खोदून पुन्हा नियोजनात पुढेपुढे करताना थकवा कधी यायचाच नाही. याच वेळी शहरात जन्म असूनही गावकऱ्यांशी केवळ संवादच नाही तर नातेही जडल्याचे आता लक्षात येते.

त्याच वयातील दुसरी शिदोरीही वडिलांच्या सामाजिक-राजकीय कार्यातून लाभलेली! नगरसेवक म्हणून दिवसरात्र खपल्यानंतरही निवडणुकीत एका रात्रीत पुरीभाजी वाटून मते वळवल्याचे धक्कादायक दु:ख पाहिलेच. त्यामुळे निवडणुकीच्या राजकारणाविषयी मनात एक वेगळाच कंगोरा निर्माण झाला असावा.. पण कामगारांनी भरलेल्या आमच्या दोन छोट्या खोल्यांच्या चाळीतल्या घरामध्ये चाललेल्या त्यांच्या बैठकांमधून संघटनप्रक्रिया, मजूर-मालक बोलणी, संघटित शक्तीचा दबाव, कामगारांच्या बदलत्या वृत्ति-प्रवृत्ती, राजकारण व समाजकारण यातील दुही.. हे सारे प्रशिक्षण मिळत गेले. एकदा दिवाळीचा बोनस कामगारांना मंजूर न करता, बोलणी फिसकटल्यावरही घरी मिठाई पाठवणाऱ्या मालकाला, तो बॉक्स भिरकावून उत्तर देणाऱ्या वडिलांचा करारीपणाही तडजोडीच्या मिळमिळीत भूमिकेऐवजी कणखर भूमिकेसाठी प्रेरित करून गेला. युवावस्थेतील आमचे कॉलेजचे विश्व आजच्यापेक्षा अगदीच वेगळे! आमचे एकपात्री झाशीच्या राणीचे, संभाजीचे प्रयोग वा प्रॅक्टिकल्स बुडवून भाग घेतलेल्या स्पर्धा, त्यात जिंकलेली पदके यांतली प्रत्येक घटना काही तरी विशेष देऊन जायची. उत्स्फूर्त वक्तृत्वाच्या निमित्ताने कधी सिमला-करार, कधी क्रांतीची पावले अशा विविध विषयांवर तयारी केल्याने अनेक विचार पक्के झाले. तरी वैचारिक बांधिलकी लोकशाही समाजवादालाच राहिली. बॅ. नाथ पै कधी तर कधी नरहर कुरुंदकरांसारखी व्याख्यानेही मेजवानी वाटायची

तर आणीबाणीतील भूमिगतांना मदत देशभक्ती ठरायची. विविध जाति-धर्मांच्या देशभरातील ५००० तरुणांच्या मेळाव्याने नवदर्शन घडवले. त्या पाच रात्री न झोपता केलेले काम विसरणे शक्यच नाही कधी. पण अगदी तशीच स्वत:चीही परीक्षा घेण्याचे घडले ते त्याच्या अनेक वर्षांनंतर १९८९ मध्ये. हरसूद येथील नर्मदा खोऱ्यातील ३५००० लोकांच्या भव्य मेळाव्यात! आजही बळ मिळते या साऱ्यातून.

डॉक्टर होऊनच खरे सामाजिक कार्य, ग्रामीण क्षेत्रांत करता येईल, हा पक्का विचार असताना, सतत स्पर्धा, शिबिरे.. अन्य कार्य करण्यातच वेळ व लक्ष देताना फर्स्ट क्लास कधी नव्हे तो हुकलाच म्हणूनच टाटा सामाजिक विज्ञान संस्थेतील अभ्यासाकडे वळले! अर्थात तो निर्णय चुकल्याचे कधीच भासले नाही. पदव्युत्तर अभ्यासात समाजशास्त्रीय पदवीपर्यंतचा पाया पक्का करूनच डॉक्टरेटचा अभ्यास केला त्यामुळे तोही राजकीय परिपक्वता देणारा ठरला. पण कधी कधी प्रश्न पडतोच, समाजकार्याऐवजी डॉक्टर बनून खपले असते तर? डॉक्टरेटचा अभ्यासही मुंबईच्या गरीब वस्त्यांमधील कामापोटी वाटेवर सोडला. अनेक प्राध्यापक पीएच.डी. पूर्ण करूनच टाक.. जे करते आहेस ते लिही, हे समजावत होते. पैसे कमावूनच शिक्षण शक्य होते, अशीच कौटुंबिक परिस्थिती होती. म्हणून पार्ट टाइम पीएच.डी.ची सोयही त्यांनी केली. परंतु माझ्या डोक्यात धून होती, तळागाळात खपण्याची! एम.फिल.पर्यंतचा अभ्यास, समाज व राज्यशास्त्रीय वाचन, समता, न्याय, लोकशाहीपासून ते विकास, जनआंदोलन, दलित, आदिवासी व आर्थिक विकास तसेच शिक्षण या विषयांवरील शोध पेपर्स लिहून झाल्यावर केवळ पदवीसाठी अडकून बसणे योग्य वाटले नाही; त्यापेक्षा वंचित समाजासाठीचे कार्य पुढे न्यायचे महत्त्वाचे होते. गरीब वस्त्यांत त्याचा पाया घातला व नंतर ३ ते ४ वर्षांनंतर विक्रोळी पार्कसाइटमध्ये मोठ्या प्रकल्पाचे काम उभारले. काही हजार गरीब मुलांचे शिक्षण, अनेक मंडळांची पायाभरणी व कार्यकारिणी पुढे नेण्याचे समाधान मिळाले. बिल्डर हिरानंदानींना त्या वस्त्यांवर घाला घालण्यापासून रोखले ते प्रथम त्याच वस्तीच्या संघटित बळावर!

१९८०चे दशक वेगळी वाट घेऊनच अवतरले जणू! गुजरातमध्ये जिल्ह्याजिल्ह्यात फिरताना, बंजारा, आदिवासी, दलित, वणकर समाज इत्यादींसहचे धरणानेच भूमिहीन केलेल्या समाजासहचे कार्य पटले. त्यानंतर शिक्षकपेशातून या कार्यात उतरलेल्या भानुभाईचे साधेपण, समाजाशी समरसता पाहून गुजरातच्या उत्तरपूर्व आदिवासी पट्टीतील अनेकानेक छोट्या-मोठ्या संघटनांसह, आदिवासी युवकांच्या समूहासह कार्य सुरू झाले. साबरकांठा, बनासकांठा, पंचमहालमधील गावेच्या गावे माझ्या पायाखालून गेली. आदिवासींचीच साधने हिरावून घेत 'विकासाचे भांडवल' म्हणून त्यावर आपला महाल बांधत त्यांची कबरच उभारण्याची दिशा तिथेच सर्वप्रथम उमगली. स्पेन्सर-कॉम्प्टे ते पार्सन्स व मार्क्सच्या आणि रजनीभाई कोठारीसारख्या भारतीय समाजशास्त्रज्ञांच्या सिद्धांताची पडताळणी सुरू झाली. डांगमधील आदिवासींना विदेशी मदतीने कसे 'समाजकार्य' क्षेत्रातही पार बदलून 'मॅनेजर' बनवले त्याचा पूर्ण अभ्यास करण्याची संधी मिळाली. गुजरातमधील व्यापारी वृत्तीच्या परिघावरील आदिवासी मात्र निसर्गावरच जगणारे तेही उखडल्यामुळे अहमदाबादमधील मला राहायला दिलेल्या जुन्या टुमदार घराजवळच येऊन बसायचे. त्यांचे जथेच्या जथे! मजुरी, काम मिळाले नाही तर पैशाअभावी काही दिवस पायी चालून मूळ गावी पोहोचायचे.. या साऱ्यांनी मनात घर केले, ते कायमचेच. आज 'गुजरात मॉडेल'च्या भूलभुलैयातून देश जात असताना, गुजरातमधील आदिवासींसह तसेच अहमदाबादमधील मजूर, शेतकरी, दलित, महिला संघटनांसह केलेले कार्य मनात कायम राहिले. मात्र समाजविभाजन व त्यातून उभे केलेले राजकारण, गांधीवादी तसेच नवनिर्माण आंदोलनातून निपजलेले, दलित-मजूर संघटक, खेडुत समाज तसेच दक्षिण गुजरातमधील धरमपूर (बलसाड) व सौराष्ट्रातील गृहनिर्माण, जलनियोजनाचे

पर्यायी तंत्रज्ञानाचे कार्य, डांग ते बनासकांठातील सहकारी संस्था व भूमिसंघर्षांचे कार्य सारे पाहायला मिळाले, ते तिथेच.

अशा व्यापक समन्वयाची भूमिका तिथेच मनात बांधली गेली. ऊसकापणी-मजुरांवर कोर्टाच्या नियुक्तीनंतर केलेला अभ्यासही अर्थशास्त्राचे गौडबंगाल व सहकारी साखर कारखान्यांतर्गत शोषण तसेच कायदेशीर लढाईची अभूत जाण देऊन गेला. तेथील पुरोगामी वकील समूहासह नाळ जुळली.. त्याबद्दल लिहू तरी किती? कधी गांधीवाद्यांच्या मर्यादा पुढे आल्या तर गांधी, आंबेडकर, मार्क्सना जोडून घेण्याची गरज पुरेपूर पटली. याच गुजरातमध्ये २००२ चा धार्मिक अत्याचार होईल, असे वाटलेच नव्हते! नर्मदेच्या प्रश्नावरही इतके संवेदनाहीन व अन्याय्य राजकारण उभे राहील, हे सांगून पटले नसते.

महाराष्ट्रातील नर्मदाकाठच्या गावांमध्ये प्रथम पाऊल ठेवले ते गुजरातकडूनच येऊन. वसुधा धागमवार या वकील कार्यकर्तीसह धुळे जिल्ह्यातल्या आदिवासी गावात व नदीपार अलिराजपूर जिल्ह्यात अडीच दिवस पायी चालून गेलो. त्या दरम्यान झालेल्या आदिवासींसहच्या संवादातून सरदार सरोवर धरणामुळे उद्ध्वस्त होऊ घातलेल्यांविषयी सरकारच्या संवेदनाहीनतेच्या कहाण्या पुढे आल्या व माझ्याही डोळ्यांपुढे नर्मदेची पुढील कहाणी रचली गेली. बिलगाव, जुनाने, निमगव्हाण, मणिबेली तसेच जलसिंधी (म.प्र.) या गावांशी जडलेले त्या वेळचे नाते आजवर कसे कसे पुढे गेले ते शब्दांत सांगणे कठीण. मात्र त्यातून चोखाळली गेली एक नवी वाट.. हापेश्वर या आता जलमग्न झालेल्या मंदिरात उगवलेल्या पहाटेतून! आजही बोटीने हापेश्वरमधील जलाशय पार करताना आठवते, नर्मदेच्या भविष्यावर रचलेले पहिले गाणे.. धडधडत्या पहाडी रस्त्यावरून बस प्रवासातच.. 'धरण आलं ग धरण आलं..' जे माझ्या नर्मदा-परिक्रमेतील सारे वैचारिक टप्पेच एकप्रकारे उमटवत गेल्याचे कळते. असो. ही परिक्रमा नर्मदाभक्तांसारखी ३ वर्षांची न ठरता, आता ३० वर्षांची झाली. यातील टप्पे व वेडीवाकडी वळणे तसच नाडले-नागवले गेले तरीही परिक्रमावासींना होतो तसा आनंद आणि आजही न संपलेले आह्वान हे कायम आहे. दहा दहा वर्षे सतत, सखोल, प्रदीर्घ कार्य करणारी तरुण कार्यकर्ता टीम व ३० वर्षे लढणारे, निर्माणकार्यही करणारे आदिवासीच नव्हेत तर छोटे-मोठे शेतकरी, दलित, मजूर, कुंभार, मच्छीमार हेच याचे खरे साक्षी आहेत. देशभरातील संवदेनशील साक्षीदारच नव्हे तर सहयोगीही आजही सोबत आहेत. ही मांदियाळी वाढत, पसरत गेली व राष्ट्रीय समन्वयाची भूमिका तयार झाली.

मध्यप्रदेशातील २५०० खोट्या खरेदीखतांसह, पुनर्वसन-स्थळांवरील निर्माण कार्यातील व अन्य भ्रष्टाचार शोधल्यामुळे गुजरात सरकारने दुष्काळग्रस्तांच्या नावे मिळवलेले पाणी, खोरे बुडवूनही कंपन्यांच्याच बाजूने वळवल्यामुळे प्रदीर्घ जल- सत्याग्रह, उपोषणे आदीद्वारा आवाज उठवणाऱ्या खोरेवासींना आता कोर्टाची लढाईसुद्धा गेली अनेक वर्षे साथसाथ पुढे न्यावी लागते आहे. जलसत्याग्रह 'जलसमाधी'पर्यंत गेल्यावरच सरकारने पुनर्विचार विशेषज्ञ समूह गठित केला. त्यांचाही अहवाल, सरदार सरोवराचे लाभ, उपलब्ध पाणीच कमी असताना फुगवून दाखवल्याचे, पुनर्वसन व पर्यावरणीय हानिपूर्तीचा आराखडा तयार नसल्याचे सांगणारा बाजूस सारला गेला तेव्हा करणार काय? २००८ मध्ये गंभीर पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास होऊन पाण्डे समितीचा अहवालही एक प्रकारे नाकारणाऱ्या सरकारांनी वेळोवेळी धरण पुढे रेटले, ज्याचा जून २०१४ च्या निर्णयातून अंतिम टप्पा सुरू होताच हा निर्णायक लढाईचा मुद्दा बनला नसता तरच नवल!

या साऱ्या लढाईत 'भूसंपादन' हे ब्रिटिश कायद्यावर आधारित लोकशाहीविरोधी प्रक्रियेतून लादण्याविरुद्ध संघर्ष सुरू करण्याचा एक नवा टप्पा १९८७ पासून सुरू झाला होता. तसेच विकासाच्या संकल्पना व नियोजनाला आह्वान देत पर्यायही देण्याचा! याचेच रूपांतर राष्ट्रीय पातळीवरील समन्वयात झाले व दोन राष्ट्रीय यात्रांमधून (१९९६ व २००३) विविध प्रकारची संकीर्णता, सांप्रदायिकता, जातिवाद, विषमता, अन्याय यांना नाकारताना, पर्यायी जनविकासाचे पैलू, प्रक्रिया, तंत्रज्ञान व योजना मांडल्या गेल्या. आजही भूमी व तिच्याशी जोडलेली सर्व नैसर्गिक संसाधने कसणाऱ्या, राबणाऱ्याच्या हाती राहावी, यासाठी व्यापक संघर्ष सुरूच आहे. हे करत असताना अर्थातच पावले रोखणारेच नव्हे तर दहशतवादी, हिंसक वृत्तीही समोर आल्या. कॉरपरेट-राजकीय ताकदीतून गुजरातमध्ये कार्यालयांवर व साबरमती आश्रमात गुजरातच्या दंग्यानंतर झालेला हल्ला त्यातलाच! या साऱ्यांतून एक नवे आह्वन उभे राहिले ते खोट्या आरोप-प्रचाराचे !

कुणाच्या हाती माध्यमे तर कुणाहाती पैसा, सत्याचे असत्य करून बदनामी करण्याचे षड्यंत्र आजही सुरूच आहे; मात्र त्याला पुरून उरताना वेळ, ऊर्जा किती खर्च करावी की कसे व सत्यच नव्हे तर विवेकाच्या आधारे आपले विचार, कार्य, भावना, पद्धती, जीवनही जवळून न पाहणाऱ्यांना पटवावे की नये, याचा निर्णय थांबून घ्यावा लागला. म्हटले तर छोटे, तरीही महत्त्वाचे हे टप्पेही नाकारता न येणारे. आजपर्यंत या अनेक घटनांवर न्यायदेवतेला साकडे घालायला लावणारे!

नर्मदेचे आह्वान स्वीकारत, कोर्टात केसेस लढवत एकेक किल्ला गाठतोय. स्वत: केसेस लढवण्याचा निर्णयही नवी वाट चोखाळणारा ठरला. आदिवासी विस्थापितांना जमीन न देता बुडवल्यानंतर मध्य प्रदेशातील आदिवासींनी शासकीय कृषिकेंद्राच्या रिक्त जमिनीवर शेती करून जमीन-हक्क-सत्याग्रह सुरू केला, त्या वेळी पोलीस फौज आणून महिला व अन्य कार्यकर्त्यांसह काहीशा अमानुषपणे जेलमध्ये रात्रीच टाकले तेव्हा जेलमधून मी लिहिलेल्या पत्रावर केस उभी राहिली. पाच दिवसांनी सुटून आल्यावर वकिलांच्या म्हणण्यानुसार मलाच कोर्टापुढे हकीकत सांगावी लागली. तिथूनच ब्रेक थ्रू झाला! सुरुवातीस 'माय लॉर्ड' म्हणायचे म्हणजे कसेसेच व्हायचे! तरीही तळागाळाच्या सखोल माहितीच्या आधारे, विरोधक शासनातर्फे मोठमोठे वकील दणकून असत्य मांडणी करणार, उलटे आमच्यावरच खोटे आरोप करत असताना या वास्तवाला सामोरे जाऊ शकले. संवेदनशील न्यायाधीशांना पटवून देण्याचा आनंद वेगळा आणि तरीही कोर्टासाठी रात्रभर वा पहाटे उतरून स्टेशनवरच धडधडती तयारी वीसेक फाइल्ससह करून कोर्टात काही तास बाजू मांडण्याचे कष्टही आगळेच! हातात साधने नाहीत, फंड नाहीत, वकिली मोफत तरीही आजकाल कोर्टाचे कामकाज खर्चीक! या स्थितीत व्यापक ते स्थानिक मुद्द्यांवर न्याय मिळवत, लढाई चालूच आहे.

साधने नाहीत म्हणताना आंदोलनाची निर्धनस्थिती ही आम्हीच वेगळी वाट चोखाळण्यामुळे निर्माण झाली, हे सांगायला हवे! पहिला विदेशी पुरस्कार राईट लाइव्हलीहूड अॅवॉर्ड उर्फ पर्यायी नोबेल पुरस्कार प्राप्त झाला तेव्हा त्याची खबर घेऊन जेव्हा स्वीडनचे प्रतिनिधी आले, तेव्हा सुमारे ५५००० डॉलर्सच्या रकमेपैकी एक पैसाही आंदोलनाने न स्वीकारण्याचा निर्णय हा रात्रभर चिखल्दा गावातील जैन मंदिरात ३०० गावप्रतिनिधींच्या सभेत सारासार चर्चा होऊन घेतला गेलेला! साथीला उभे होते, बाबा आमटे! त्यानंतरच्या पुरस्कारांबद्दलही हा विदेशी पैसा न स्वीकारण्याचा निर्णय घेऊन आज आम्ही त्रस्त असलो तरी खोटे आरोप करणाऱ्यांविरुद्ध आश्वस्त आहोत!

नर्मदेच्या संघर्षांत अनेक मार्ग काढावे लागले. मणिबेलीपासून विश्व बँकेपर्यंत आणि आपल्याच सरकारांपासून वर युएसकाँग्रेसपर्यंत हा संघर्ष बरेच शिकवून गेला. हिंसक की अहिंसक या प्रश्नाचे उत्तर ठाम राहिलेच; तसेच जनशक्तीच्या जोरावर 'संघर्ष व निर्माण' हे ब्रीदही! या निर्माण कार्यात शिक्षण, आरोग्य, रोजगार, रेशनिंग अनेकानेक मुद्यांबरोबर मत्स्यसंपदा आणि नदी व पाण्यावर अधिकार तसेच पुनर्वसनाच्या अधिकारासाठी संघर्ष हा आलाच. निर्माण-कार्यामध्ये जीवनशाळाच आमची केंद्रे. शासकीय शाळा स्वातंत्र्यापासून कागदोपत्रीच चाललेल्या. त्या चालू व्हाव्यात म्हणून विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले, धरणे धरली, पण व्यवस्था ढिम्म हलेना. शिक्षकांना निलंबित करूनही पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या!' म्हणूनच लोकांचा आग्रह व आमचा निर्धार! जीवनशाळा मणिबेली-चिमलखेडी गावातून इतर गावांत पसरल्या त्या आजपर्यंत. आदिवासी बोली व प्रांतीय भाषा मिळून शिकवणे व तेही आदिवासी शिक्षकांनी, यातूनच आदिवासी भाषेतली पुस्तके व तिच्याविषयी ओढ निर्माण झाली व टिकली. खडतर परिस्थितीत चाललेल्या या जीवनशाळांतून हजारो आदिवासी विद्यार्थी, तेही कुटुंबातील पहिले शिक्षित, बाहेर पडले म्हणून लाभले ते समाधान-संघर्षापल्याडचे!

नर्मदेचा संघर्ष राष्ट्रीय पातळीवर गेला व त्यानंतर दोन वर्षांत 'जनआंदोलना'चा राष्ट्रीय समन्वय घडला. आजवर, गेली २० वर्षे हा समन्वय देशभरच्या अनेक संस्था, आंदोलनांना जोडत बळ देत गेला. नैसर्गिक साधनांवर जनतेचा हक्क असो वा शहरी गरिबांचा घर-अधिकार, सांप्रदायिकता-जातिवाद विरोध असो वा असुरक्षित मजुरांचे प्रश्न महिला व दारूबंदी.. अनेकानेक ठिकाणी विचार, रणनीती, कार्यक्रम पोहोचवताना अर्थातच दमछाक झाली. सतत, अनेकदा महिन्यातून २० रात्री प्रवास करताना, एकेका विषयाचा अभ्यास, रणनीतीची तिथल्या संघटनेसाठी आखणी, परतल्यावर लेखन-पाठपुरावा या साऱ्यासह ऊर्जा सांभाळण्याची कसरत! यात भरच पडली तरी मुंबईतील गरिबांचा प्रश्न हाती घ्यावाच लागला, त्याची.

घडामोडीच अभूत योगायोगासारख्या! एकदा मुंबईत आले असता, काही कार्यकर्ते आग्रहाने आवाज उठवण्यासाठी, निर्घृणपणे तोडलेल्या गरीब वस्तीत घेऊन गेले. नेताजीनगर! मुडद्यासारख्या पडलेल्या घरामधला विस्कटलेला संसार, तरी टिकून राहिलेली चिवट माणसे-मुलेबाळे, आजारी, गर्भवती! कोणी मंत्रालयात रंगरंगोटीचे, कुणी महानगरपालिकेत सफाईचे काम करणारे, कुणी ड्रायव्हर तर अनेक जणी बाजूच्याच बिल्डिंगमधल्या मोलकरणी अथवा मातीकाम करून मुंबई उंचीवर नेणारे! त्यांनाच घर नाही. सारे मतदार, तरी 'अतिक्रमणदार'. एकूण ७५ हजार घरे तोडलेली पाहून जीव कळवळला. १९७६ ते १९७९ पर्यंत विक्रोळीच्या ८०००० कुटुंबांच्या वस्त्यावस्त्यांतून केलेले काम आठवले. त्याही उखडल्या असत्या तर? हो, त्याही उखडण्याच्याच मार्गावर. अर्ध्याअधिक खोदलेल्या. त्यांना भोवणारे कारस्थान बिल्डर व गुंतवणूकदार नेत्यांचे! नेताजीनगरमध्ये महानगरपालिका, पीडब्लूडी, पोलीस एकत्रित उभे! दोनच दिवसांत साऱ्या संघटनांनी आयोजिलेल्या आझाद मैदानातील सभेत 'घर बचाओ घर बनाओ'चा उत्स्फूर्त नारा दिला. आणि सभा संपते ना संपते तोच गोवंडीचे काही लोक मंचावर चढून विचारू लागले. "आमची वस्ती उद्याच तुटणार.. वाचवायची तर कशी?" "मी येते ना! सर्वांनाच बोलावू. पाहू काय होते ते! तयार आहात ना?"

दुसरे उत्तर तरी काय देणार?

दुसऱ्याच दिवशी नवे वळण घेतले कार्याने! कचरापट्टीवर वसलेली रफिक नगरची वस्ती. त्या दिवशीचा सत्याग्रह, अटक आणि नंतर संघटित झालेली मुंबईतील गरिबांची ताकद! त्यातही महिलांची कुठे चूल, कुठे मूल.. कष्टाने कमावणाऱ्यांनी कंबर कसून रस्त्यावर येऊनच निवाऱ्याचा अधिकार भीक म्हणून न मागता खेचून घ्यायचे ठरवले.

हजार रुपये भाडे शक्य नाही, घर बांधायचे तर जागा नाही, तेव्हा जगण्याचा आणि निवाऱ्याचा अधिकार म्हणून त्याच जागेचा कब्जा घेतला. साठेनगर, मंडाला, आंबुजवाडीपर्यंत एकेक वस्ती उभी राहिली.

या आंदोलनानेही चढउतारच काय, गटारागत अवस्था, बिल्डरांचे अत्याचार, शासकांची धोकेबाज आश्वासने पाहिली. सारे समजावून, साबित करूनही, हाती आलेच तर श्रेय ते लाटणार.. तरीही पुन्हा सतत संघर्षांतूनच अंमल करवून घ्यायचा..! आदर्श, हिरानंदानी अशा अनेक प्रकरणांबरोबर 'जमिनीं'चा मुद्दा उठला. आम्ही अतिक्रमणदार, बेकायदेशीर, तर तुम्ही कोण? 'गोळीबार'मधील, मुलूंडच्या आंबेडकरनगरमधील.. अशा अनेक बिल्डरशाहीच्या प्रकरणांतील कायद्याचे उल्लंघन वेशीवर टांगले. चौकशी झाली. तीही हजारोंच्या मोर्च्यानंतर. अहवालात फसवले तरी लोक टिकून राहिले. या आंदोलनात अनेक पोलीस चौक्यांतला अभूत भ्रष्टाचार पाहिला. व वस्तीतील मोजक्याच गुंडांचा तेथील मुलेबाळे-महिलांवरचा अमानुष अत्याचार.. या साऱ्यांनी हबकूनच जायला होते.

देश बदलण्याचा अजेंडा मांडताना, आवंढा गिळवत नाही. दाटून येते सारे. कुणाला सांगणार, पटवणार? मुंबईतील कुणी रिक्षावाला असो वा गरीब झाडूवाला.. रस्त्यात भेटताच मनस्वी चार शब्दांत भावना व्यक्त करतो. हॉकर्स कायदा आणण्यासाठी खपलो म्हणून फेरीवाला ओळखतो.. जसा ग्रामीण शेतकरीही भूसंपादन कायदा बदलण्यासाठीचा संघर्ष जाणून असतो. तीच तर असते पावती..

शेवटची नाही तरी आणखी एक नवीन वाट जोखून पाहिली ती गेल्याच वर्षी. निवडणुकांच्या राजकारणाची. निदान २००६ पासून निवडणुकीत उतरण्यासाठी आग्रह धरणारे अनेक. त्यांच्याशी झालेल्या चर्चांबरोबरच गुजरात मॉडेल जवळून पाहिले असल्याने, त्यालाही आव्हान देण्यासाठी आधी नकार व शेवटी होकार देऊन, जवळच्या सहकाऱ्यांशी दहा वेळा चर्चा करून मन घट्ट केले व उतरले. अनेकानेक युवा, जुने समाजवादी ते मार्क्सवादी, दलित, आदिवासी अगदी आमच्या मुंबईच्या रस्त्यांवरच्या पारधी बायाही साथीला उतरल्या. साऱ्यांचे ऋण फेडण्यासाठी तरी जिंकलो असतो तर वाट पूर्ण बदलून मंजिल तीच ठेवून धावलो असतो त्यावर. पण तसे व्हायचे नव्हते..

यापुढे काय, हा प्रश्न विचारण्यासही फुरसत त्यानंतर मिळालेली नाही. विश्रांती हवी आहेच, पण शांती हवीय, आज देशातील राजकारणाबरोबर समाजानेही चोखाळलेल्या वेगवेगळ्या वाटांवरून सुरळीत पुढे जातानाच, आपले ध्येय गाठण्यासाठी नवनवीन रचना, संरचना, प्रक्रिया घडवतच ते पेलावे लागणार..

'लोकसत्ता'च्या सौजन्याने

medha.narmada@gmail.com

•••

# त्रुटित जीवनी...

*अतुल देऊळगावकर*

पुस्तकपरीक्षण खाउजा विवेक

*'जनतेच्या मनावर नियंत्रण मिळवण्याकरिता दरवर्षी हजारो कोटी खर्ची पडत असतात. काय घडत आहे यापासून सर्वसामान्य जनता अनभिज्ञ असते आणि याची त्यांना जाणीवदेखील नसते.''*

नोम चोमस्की.

व्यक्ती व नाती दोन्हींचं वस्तुकरण झाल्यामुळे आपल्याला कुणाशीही जोडून घेण्यासाठी (कनेक्ट) उपयोगिता हा एकमेव निकष झाला आहे. बाजारपेठेत आपल्या मूल्यात वृद्धी कशी होईल, या काळजीनं सगळे ग्रासून गेले आहेत. घरापासून दारापर्यंत, संस्थेपासून यंत्रणेपर्यंत उदारतेची हेटाळणी, सहिष्णुतेची नालस्ती व करुणेची अवहेलना वृद्धिंगत होत आहे. जिव्हाळा आटत जाऊन वरचेवर परिपूर्ण शुष्क (सॅच्युरेटेड ड्रायनेस) होत चाललेल्या वातावरणात संवेदनशीलतेची ससेहोलपट होत आहे. अशा परिस्थितीत सभोवतालच्या असंख्य घटनांचा अन्वय लावणं हे अतिशय यातनादायक असतं. कारण त्यातून आगामी काळाची चाहूल लागते आणि ती जीवघेणी असते. नंदा खरे यांनी कमालीच्या अस्वस्थतेतून वर्तमानाचा वेध घेत 'उद्या' या कादंबरीत भविष्याचा बहुआयामी विशाल पट सादर केला आहे. ललित, वैचारिक, कथा, कादंबरी हे सारे भेद पुसून त्यांचा संगम घडवला आहे.

'उद्या' हा आजपासून अगदी तीनशे वर्षे पुढे एवढा सैल आहे. या कालावधीत सुदीप जोशी, अरुण सन्मार्गी, सच्चिदानंद भाकरे, सानिका धुरू या प्रमुख पात्रांच्या आयुष्यावर आळीपाळीने झोत टाकला जातो.

आयआयटी, एमआयटी, यूपीएससी मार्गे सायबर क्राइम आयुक्त झालेला अरुण सन्मार्गी अभिव्यक्ती व वर्तनविश्लेषक आहे. राग आणि ताण याविषयी अभ्यासाच्या विशेष गटात राहून त्यांनी चेहरेपट्टीत होणारे बदल ओळखणारे संगणक प्रोग्रॅम तयार केले. त्यांची बायको अनू वर्तणूक-अर्थशास्त्रज्ञ असून दोघेही झपाट्यानं वरच्या श्रेणीत जात आहेत.

सुदीप जोशी हा महिकादळ या मुंबईतील एका प्रमुख पक्षाच्या संघटनेच्या दादाचा लेखनिक आहे. शिकलेला असल्यामुळे त्याला दांडगाई जमत नाही. मांडवली करण्यात मात्र तो तरबेज होतो.

सच्चिदानंद भाकरे, अमरावती जिल्ह्यातील तीनखेडा गावात मुख्याध्यापक होता. नायब तहसीलदार, गावातील आमदाराचा दलाल, नगरसेवक आणि सच्चिदानंद यांनी मिळून २०-२० ही संघटना काढली. युवकांना रोजगार मार्गदर्शन करण्यापासून सुरुवात झाली. मग टीपीएल (तीनखेडा प्रीमियर लीग) भरवणे, वधूवर सूचक मंडळ, ओळखपत्र काढणे, ज्यूडो-कराटे शिकवत अश्रुधुराचे डबे व तिखट विक्री अशा नानाविध सेवा सुरू झाल्या. मध्यमवर्गीय पार्श्वभूमी असलेली सानिका धुरू ही Round & About या ई-वृत्तपत्राची वार्ताहर आहे. उच्चपदस्थांशी सलगी, सत्तावर्तुळातील संपर्क आणि प्रचारार्थ (lobbying) लिहून पदांच्या शिडीवर कुठेही उडी घेता येते. अशा काळात सानिका एकोणिसाव्या शतकातील ध्येयवादी पत्रकारिता जपण्याची आकांक्षा बाळगून आहे. प्रचारकांचा उद्देश ओळखून त्यांची बातमी तशी होऊ न दिल्यामुळे सानिकाला वाळीत टाकलं आहे. नक्षलवादी भागात

जाण्याची शिक्षा मिळाली आहे. अतिशय खडतर जीवन असूनही निसर्गसान्निध्यातील साध्या, सरळ लोकांत सानिका रमून जाते.

प्रमुख पात्रांमुळे पोलीस यंत्रणा व शाही नोकर, कंत्राटदार व राजकीय पर्यावरण, माहिती व जैवतंत्रज्ञांची दुनिया, कॉर्पोरेट विश्व, स्वयंसेवी जगत यांमधील संबंध लक्षात येतात. बारकाव्यानिशी ग्रामीण व आदिवासी भागातील जीवन समजते. एकंदरीत गावापासून महानगरांपर्यंत, शेतीपासून हॉटेलपर्यंत, शिक्षणापासून विजेपर्यंत, कोणत्याही मार्गाने कुठेही गेलं तरी, देशाचा बहुतांश अर्थव्यवहार काबीज केलेल्या 'भरोसा' व 'विकास' या दोन उद्योगसमूहांपर्यंत आपण जाऊन पोहोचतो. वाहतूक, बांधकाम, ऊर्जा असे महत्त्वाचे सगळे उद्योग दोघांच्याच ताब्यात आहेत. या दोन उद्योगांची आपसांत अजिबात स्पर्धा नाही. भरोसा आणि विकास यांनी मुंबईमधील वाहतूक-वसाहत योजना बनवली. सर्व स्टेशन्सची वाटणी करून घेतली. प्रत्येक स्टेशनभोवती ४० मजली इमारती झाल्या. रस्त्यावर बस आणि मोटारगाड्यांसाठी वेगळी सोय झाली. सत्ताकेंद्राभोवती फिरणाऱ्या विविध कक्षांतील सर्व तऱ्हेच्या प्रवृत्तींना प्रसन्न करून घेतलं. "सगळे केंद्र-राज्य मंत्री, संसद, विधानमंडळ, विद्यापीठं, चॅनेलवाले, पेपरवाले, एनजीओज, युनियन्स, चेंबर्स, कुत्री, मांजरं सगळ्यांना खूश केलं. मग दादर-विकास, दादर भरोसा, सक-सँक चर्चगेट अशी नावं झाली आहेत," असं मर्म नंदा खरे सांगतात.

आता पाच कोटींच्या महामुंबईत केवळ दोन कोटी महिला आहेत. स्त्रीजातीच्या आबालवृद्धेस संध्याकाळी एकटीनं बाहेर पडणं अशक्य आहे. नोकरदार महिलांना स्टेनगनधारी रक्षक सोबत घ्यावा लागतो. तरीही रोज दहा-पंधरा बलात्कार होतात. संघटित टोळ्यांनी जागांचे सुभे वाटून घेतले आहेत. त्यांना व पोलिसांना योग्य ती किंमत मोजून शांतता व सुरक्षितता विकत घ्यावी लागते.

समस्त नागरिकांचं खासगीपण पूर्णपणे संपुष्टात आलं आहे. सर्वत्र कॅमेऱ्यांची नजर आहे. मोबाइल, संगणकावरील संभाषणांवर पाळत ठेवली जात आहे. असंख्य सर्वेक्षणातून ग्राहक स्वत:हूनच त्यांची आवडनिवड सांगून टाकतात. (विविध प्रकारांनी माहिती मागण्याला लेखक 'तंबूतील उंट' संबोधतात.) समस्त ग्राहकांनी दिलेल्या माहितीचं आणि दुकानातील हालचालींचं कसून विश्लेषण करण्यासाठी अनेक ज्ञानशाखांचे शास्त्रज्ञ तयार असतात. दूरचित्रवाणीवरील जाहिराती, मालिका व चित्रपटांतून नकळत मतं तयार केली जातात. अधिक वावर असणाऱ्या ठिकाणी महाग वस्तू ठेवाव्या तर पैसे देणाऱ्या रांगेजवळ अनावश्यक व माफक किमतीच्या जिनसा असाव्यात. सवलतीच्या दराला भुलवून गरज नसलेल्या वस्तू खपवाव्यात, याची चोख व्यवस्था मॉलवाले करीत आहेत. सरकार व कॉर्पोरेटस् लोकांच्या आयुष्यात सहज डोकावत आहेत. तेलंगण, विदर्भ, झारखंड, छत्तीसगड, ओरिसा या जंगलांनी व्यापलेल्या भागातच अमाप खनिजसाठे असल्यामुळे सगळ्या कॉर्पोरेट कंपन्यांना ताबा हवा आहे. पर्यावरणवादी, आदिवासी व उद्योग असा संघर्ष चालू आहे. "सच्ची अमिरी तीन चीजों से आती. मिनरल्स, लॅण्ड अँड गव्हर्नमेंट कॉंट्रॅक्ट्स! टाटाज, अंबानीज, मित्तल, डी-बिअर्स ऑल आर हंग्री फॉर सबसॉइल. ताजमहालच्या खाली तेल सापडलं तर .. द बगर्स विल डिस्ट्रॉय द ताज " भूगर्भशास्त्राचा अभ्यासक व टाकून दिलेला पत्रकार सानिकाला सांगतो. चारगाव, गोविलगड, नागोठणे या गावांतील आदिवासींमध्ये राहून त्यांचं जीवन सानिका समजून घेतेय. त्यांचं वनस्पतींचं ज्ञान, हातमागावरील सुंदर वस्त्रनिर्मिती, कुशल धातूकाम हरखून पाहतेय.

जगातील शेती संशोधन ते धान्य वितरण हा भार दोन-तीन कंपन्या उचलत आहेत. 'मोन्सागिल' ही जगातील सगळ्यांत मोठी शेतीसंशोधन करणारी कंपनी बियाणं, खतं, कीटकनाशकं, तणनाशकं, पक्ष्यांना दाणे आवडू नयेत

यासाठीची औषधं तयार करीत आहे. कोणत्याही गावात वापरलेलं बियाणं 'मोन्सागिल'चं नाही हे सिद्ध करण्यासाठी त्या गावावर दबाव येतो. तसा तो चारगाववर आहे. त्याला न जुमानल्यामुळे 'मोन्सागिल' व चारगाव हे सतत हातघाईवर येत आहेत. मूठभर आदिवासी त्यांची राहणी जगतात. नक्षलवादी त्यांच्या भागात सरकारला येऊ देत नाहीत. सशस्त्र चकमकी चालू राहतात. या खनिजसंपन्न भागात सानिका आली आहे. त्यासंबंधी खरे भाष्य करतात- ''खनिज संसाधनांमधून शासक-प्रशासकांच्या हातात सहज श्रीमंती येते. विपुल नैसर्गिक साधनं असणं हा त्या प्रदेशाला शाप ठरतो. सुबत्तेमधील शासक आणि गरीब प्रजेमधील दुरावा व ताण वाढतो. प्रशासनातील वेगवेगळी खाती व विभाग यांच्यात श्रीमंतीच्या वाटपावरून वाद होतात. दुर्बळ सहजश्रीमंत देश शेजारच्या बलवान देशांना भक्ष्यणीय वाटू लागतो. आफ्रिकेतील संघर्ष, इराकभोवतीची युद्धे या स्वरूपाची आहेत.'' लेखक, विविध प्रसंगांमागील नेमके अर्थ-राजकारण व भू-राजकारण स्पष्ट करतात.

कादंबरीत सातत्यानं अनेक पात्रांच्या तोंडून मूल्यवृद्धीचा धोषा ऐकायला मिळतो. आर्थिक मूल्यवृद्धीभोवती अवघं जग फिरत आहे. नीतिवाचक मूल्यं कधीच अडगळीत गेली आहेत. मला अधिकाधिक स्वातंत्र्य हवंय. हा सर्वांचा बाणा आहे. समता आणि बंधुता यांपासून कधीच फारकत घेतली आहे, हे खरे वारंवार अधोरेखित करतात. परंतु, सध्या लहानपणापासून 'जबरदस्त संपत्ती मिळते ते उत्कृष्ट करिअर' हेच बोधामृत कानी पडत जाते. आता हे समीकरण यच्चयावत तरुणांच्या मनामध्ये घट्ट रुतून बसले आहे. शिक्षण, नोकरी असो वा व्यवसाय, कोटी कोटींनी घर भरावे हेच एकमेव लक्ष्य असते. महिन्याला पगार सहा आकडी, परंतु कामाचे तास २४x७x७! या फेऱ्यांतून समाधान, शांतता मिळणार तरी कशी? कामातून सर्जनशीलतेचा आनंद नाही. नावीन्याचा लवलेश नाही. नालस्ती, उखाळ्यापाखाळ्या हेच रंजन! काव्य, शास्त्र, विनोद, गप्पा, सामाजिक कणव या कशालाच वेळ नसणाऱ्या आयुष्याला सुसंस्कृत म्हणता येईल? असा मूलभूत प्रश्न खरे यांनी उपस्थित केला आहे. कादंबरीतील अरुण, सुदीप, सच्चिदानंद या सगळ्यांनाच झपाट्यानं मूल्यवृद्धी करून घ्यायची आहे. ती सहजासहजी होत नाही. त्यासाठी किंमत मोजावी लागते. सर्व जाती-जमातींमधील सर्व स्तरांवरील रहिवाशांची 'किंमत' चुकवायला भरोसा-विकास सदासर्वकाळ तयार आहेत. भरोसा-विकासाच्या कामांमुळेच शिक्षण, रोजगार, नियोजन कोणत्याही मंत्रालयाचा कार्यालयीन खर्च भागवला जातो. भारत सरकारच्या कार्यालयातील ६०-७० टक्के लोक थेट किंवा आडून भरोसा वा विकासाचे लाभार्थी असतात. सरकारी खाती आणि कॉर्पोरेशन्स यांच्यात फिरते दरवाजे आहेत. आज संरक्षणखात्यातील सहसचिव उद्या विकास-हांडात दक्षिण आशियाचा निदेशक होतो. आज भरोसा जनरल मोटर्सचा डेव्हलपमेंट मॅनेजर उद्या संरक्षणसचिव होऊ शकतो. भाषा असो वा विज्ञान, मानव्यशास्त्र असो वा खगोलशास्त्र, सर्व क्षेत्रांतील बुद्धिमंत त्यांच्या दावणीला बांधले गेले आहेत. देश-परदेशांतील विविध कार्यशाळा 'तेच' घडवून आणतात. म्हणेल तेवढा पगार, सर्व सुविधा, वाटेल तिथे वास्तव्य, मुलांच्या शिक्षणाची सोय थोडक्यात 'जे जे वांछील ते ते' देण्याची 'त्यांची' तयारी असते. सर्व सुखे पायाशी लोळण घेतात, त्यावेळी तुमचा आत्मा मात्र काढून घेतलेला असतो. फाऊस्टच्या 'मेफिस्टोफेलिस'सारखी अवस्था होते. पण त्याला इलाज नाही. 'त्यांच्याशी' भांडणं अशक्य आहे. 'त्यांना' टाळताही येत नाही. जेथे जातो तेथे 'ते' सज्ज आहेत.

कधी तरी पुसटशा एकांतवासात आपण टाळण्याचा आटोकाट प्रयत्न करणारे अस्तित्वाचे मूलभूत प्रश्न आपल्याला घायाळ करतातच. आयुष्यावर स्वत:चं नियंत्रण काहीही नाही, आपण आपल्यापासून तुटल्याची जाणीव गुदमरवून टाकते. मी कोण? मी कुणाचा? मी कुठे चाललोय? या यक्षप्रश्नांनी घुसमट अजूनच गहिरी होते. वरवरची, तोंडदेखली नाती त्रासदायक होतात. कोण, कुणाचा, कसा उपयोग करून घेतंय, हे समजेपर्यंत हातात काही उरत नाही.

'भरोसाच्या गगनशेटसाठी अरुण हा मासा आणि अनू ही त्याला पकडण्यासाठीचं गांडूळ झाली.' याची जाणीव झालेली अनू आत्महत्या करते. कोणी व्यसनाधीन तर कुणी उदासीनतेच्या विळख्यात सापडतात. चारगावजवळ खनिज असल्याची खात्री करून दिल्यावर 'वरच्या आदेशानुसार' पोलीस हल्ला करतात. ''जंगलाकडे पळत जाणाऱ्या नक्षली महिलांना थांबण्याचे आवाहन करूनही त्या थांबत नव्हत्या. नाइलाजाने रॉकेट प्रोपेल्ड ग्रेनेडस् वापरावे लागले. मृतदेहात सानिका धुरूचा देह होता.'' अशी नोंद होते. ''पुरेशा लोकांना ही 'पुढ्यातील' परिस्थिती घाबरवायला लागली तर ती टाळायला धडपडतील. पण आज जे 'डिफॉल्ट ऑप्शन' दिसतंय ते आहेच.'' असं मनोगतात सांगून कादंबरी-अखेरीस खरे इशारा देतात, ''आज आता वाचालही, उद्या.. '' अनेक विषयांचा व्यासंग असल्यामुळे खरे, जगभरातील असंख्य घटनांचा अन्वय लावतात. अतिविस्तार टाळून संयमाने परिस्थितीची भीषणता सखोलपणे समजून सांगतात. मिथ्यकथा, चित्रपट, ग्रामीण म्हणी, इंग्रजी पुस्तके यातून इतिहास, अर्थव्यवहार, राजकारण यांची उकल करतात. कोळी, नागपुरी, हैदराबादी, दख्खनी हिंदी, पंजाबी अशा अनेक ढंगाच्या बोलीभाषांचा वापर हे 'उद्या'चं वैशिष्ट्य आहे.

बिल गेटस व वॉरन बफे यासारख्यांच्या अतिश्रीमंतीमागील इंगित सांगताना थकियाडिस या ग्रीक इतिहासकाराचा ''बलवान त्यांना जमेल ते करतात आणि दुर्बल त्यांना भोगावे लागते ते भोगतात.'' या सिद्धांताचा दाखला देतात. जोसेफ स्टिग्लित्झ यांची 'विषमतेची किंमत' या मीमांसेवरून 'केवळ दहा हजार अतिश्रीमंतांच्या मर्जीनुसार ९९० कोटींचे जग चालते,' हे दाखवून देतात. मराठी भावविश्वाला प्रगल्भ करण्याचं सामर्थ्य असणारी ही कादंबरी प्रत्येकानं वाचणं अनिवार्य आहे.

**'उद्या'**
नंदा खरे,
मनोविकास प्रकाशन, पुणे.
पृष्ठे- २८४, किंमत- रु. ३००.

लोकसत्ताच्या सौजन्याने

deulgaonkar@gmail.com

•••

# नाव नामदेवाचे... काम ठेकेदारांचे!

*सुभाष थोरात*

माध्यम मानसिकता

अ. भा. प्रस्थापित मराठी साहित्य संमेलन घुमान येथे नामदेव नगरीत यथासांग पार पडले. घुमान (पंजाब) येथे एकही मराठी माणूस नसताना तेथे संमेलन घेण्याचा घाट का घातला गेला हे आम्हाला सुरुवातीला कळलेच नव्हते.

मराठी प्रकाशक खूपच नाराज झाले होते. कारण अशा संमेलनातच त्यांच्या पुस्तकांची विक्री मोठ्या प्रमाणावर होते. त्यांनी सुरुवातीला या संमेलनावर बहिष्कार घातला.

पुढे असे समजले की, कोणातरी बड्या ठेकेदाराला घुमान हे तीर्थक्षेत्र बनवायचे आहे त्यासाठी मराठी साहित्य संमेलनाचा इव्हेंट गरजेचा होता. आजवरचा अनुभव पाहाता एकवेळ बडे साहित्यिक संमेलनाकडे फिरकले नाहीत तरी चालेल पण ठेकेदारांनी पाठ फिरविली तर मात्र मग सगळेच पानिपत होईल. तर ‘नाव नामदेवाचे आणि काम ठेकेदाराचे’ अशी एकंदरीत परिस्थिती आहे. नाहीतर आमच्या प्रस्थापित साहित्यिकांना आणि त्यांच्या संस्थांना अचानक हा नामदेव कसा आठवला असता, ज्यांच्या ओठी आणि पोटी कायम रामदास राहिलेला आहे, त्यांना आमच्या नाम्याची आठवण अशी अचानक कशी आली असती? एकदा आर्थिक पाया मिळाला की इमारत आपसूकच उभी राहाते. मग आनंद सोहळा उभारायला असा कितीसा वेळ लागतो? पेशवाईपासूनची ती परंपरा आहे. एकदा घुमान मान्य झाले की मग नामदेवांची न कळलेली महतीही कळू लागते.

संत नामदेव वारकरी पंथाचे संस्थापक, पंजाबमध्ये ते अठरा वर्षे राहिले, पंजाबी शिकले, पंजाबीत अभंग रचले, त्यांची ऐंशी पदे गुरुग्रंथसाहिब या शिखांच्या धर्मग्रंथात समाविष्ट आहेत अशी माहिती मिळू लागली. तर एकंदर संत नामदेवांच्या कर्तृत्वाने पावन झालेल्या घुमानमध्ये साहित्य संमेलन भरविणे म्हणजे मराठी अस्मितेचा जागर करणे वगैरे आलेच, शिवाय या संमेलनाला अध्यक्ष लाभले थेट संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे वंशज असलेले - डॉ. सदानंद मोरे. पण केवळ वंशज म्हणून त्यांची मातब्बरी नाही. ते संत साहित्याचे गाढे अभ्यासक आहेत. शिवाय पुरोगामी विचारवंत वगैरेही आहेत, म्हणजे केवळ ह.भ.प.च नाहीत. आम्हाला खरेतर त्यांच्याच भाषणाची उत्सुकता होती की हा बुवा, आपला माणूस. तेव्हा, तो महाराष्ट्राची आणि एकंदरीतच देशाची आंधळ्या शतकाकडे चाललेली वाटचाल पाहाता काय मांडणी करेल? तुकारामाचे वंशज म्हणून, `सत्य असत्याशी मन केले ग्वाही मानियेले नाही बहुमता ' अशी परखड मांडणी करेल काय? अशी उत्सुकता होती. पण बार फुसकाच निघाला. एखादा फटाका पेटतो, पेटतो असे वाटते पण अचानक फुस्स होतो तसे त्यांचे भाषण झाले. बाराव्य-तेराव्या शतकातील महानुभावांपासून सुरुवात करून सोळाव्या शतकापर्यंत म्हणजे संतश्रेष्ठ तुकोबा आणि त्यांचे शिष्य निळोबा यांच्यापर्यंत ते नीट आले पण पुढे शेळपटले. त्यांच्या भाषणाची उपलब्धी इतकीच की संत साहित्य हे मराठीतील मुख्य प्रवाहातील साहित्य असून आणि त्याची नाळ त्यांनी नेमाडे, चित्रे, कोलटकर, बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ यांच्यापर्यंत जोडली. बाकी सगळा आनंदी आनंदच. त्यात जाति व्यवस्था समर्थकांचे नवे ह. भ. प. भालचंद्र नेमाडे यांना त्यांनी वरील पंक्तीत कसे बसवले हे समजले नाही.

प्रस्थापित मराठी साहित्य संमेलनात मराठीभाषा आणि मराठीसाहित्य यांच्या भविष्याची काही चिंता व्यक्त होईल अशी परिस्थिती आजवर कधीच नव्हती. त्यामुळे या संमेलनात ती असेल अशी अपेक्षा बाळगण्यात काहीच अर्थ नव्हता. शिवाय खुद्द अध्यक्षांनीच आपल्या अध्यक्षीय भाषणात हा मराठी साहित्याचा `आनंद उत्सवच' आहे असे म्हटल्यावर `खाओ, पिओ, पर्यटन करो' अशा आनंदाला उधाण येणारच. तसे ते आलेच. या संमेलनात काय काय पदार्थ खायला मिळणार याची वार्ता वर्तमानपत्रांनी चवीने छापली होती. म्हणजे मराठी साहित्याबद्दल चर्चा काय होणार याला काहीही महत्त्व नव्हते. तर काय काय खायला मिळणार याची मात्र जंत्री दिली होती. यावरून या साहित्य-संमेलनाचे गांभीर्य कळून येते. संत नामदेवांबद्दल जर एव्हढा कळवळा असेल तर त्यांचे कार्य तरी गंभीरपणे पुढे आणले पाहिजे पण तिथेही आनंदी आनंदच. संत नामदेव हे वारकरी पंथाचे संस्थापक होते आणि गुरुनानक यांच्या

प्रमाणेच जे सनातन वैदिक धर्माच्या कर्मकांडांच्या, जातिव्यवस्थासमर्थनाच्या विरोधात होते. म्हणूनच त्यांची पदे गुरुग्रंथसाहिब या शीखधर्मग्रंथात समाविष्ट केली आहेत. एका विठ्ठलभक्तीखेरीज ते बाकी सर्व गोष्टी झूठ मानीत होते. पुढे त्यांच्या परमशिष्याने म्हणजे संत श्रेष्ठ तुकारामांनी, `तीर्थें धोंडा पाणी, देव रोकडा सज्जन' असे जे म्हटले ते संत नामदेवांच्याच उपदेशाचे सार आहे. वारकरी पंथात वेद वगैरे वैदिकधर्माचे लचांड घुसवण्याचे काम संत ज्ञानेश्वरांनी केले. तर ते असो. आपला मुख्य मुद्दा हा की नामदेव हे जातिभेदविरोधी, सामाजिक समतेचा आग्रह धरणारे होते, त्यामुळेच त्यांची पदे गुरुग्रंथसाहिबामध्ये समाविष्ट केली आहेत. नामदेवांचा तोच वारसा आहे. याकडे दुर्लक्ष करून केवळ संत नामदेवांचे वरपांगी भजन करण्यात काय अर्थ आहे. अर्थात प्रत्येक गोष्ट आपल्या सोयीप्रमाणे, फायद्याप्रमाणे वापरण्याची प्रस्थापित संस्कृतीची परंपराच आहे. अगदी देव न मानणाऱ्या बुद्धालाही नववा अवतार करून बुद्धाचे कार्य विकृत करण्याचा प्रयत्न सनातन प्रस्थापित संस्कृतीने केलाच आहे. आणि जे पचवता येत नाहीत त्यांचे सरळ खून पाडणे, जी परंपरा डॉ. नरेंद्र दाभोलकर, कॉ. गोविंद पानसरेंपर्यंत पोहोचली आहे.

अखिल भारतीय प्रस्थापित मराठी साहित्य संमेलने ही कधीच अखिल मराठी भाषिकांची आणि मराठी भाषेची प्रतिनिधित्व करणारी संमेलने नव्हती. न्यायमूर्ती रानडे यांच्या पुढाकाराने भरवलेल्या पहिल्या ग्रंथकार सभेपासून ही परंपरा राहिली आहे. म. फुले यांनी ग्रंथकारसभेला पत्र लिहून आमच्या शूद्रातिशूद्रांना अशा संमेलनाचा काहीच फायदा नाही असे सांगून मूलभूत प्रश्न उपस्थित केले होते ते आजही कायम आहेत. अखिल भारतीय प्रस्थापित मराठी साहित्य संमेलनात काही फुटाणे, वाटाणे दिसत असले तरी त्यांचे स्वरूप चवीला उपयोगी पडणाऱ्या लोणच्यासारखे आहे. म्हणूनच या संमेलनाच्या विरोधात आजवर दलित साहित्य संमेलने, ग्रामीण, आदिवासी, दलित संमेलने आणि अलीकडे विद्रोही साहित्य संमेलने भरविली गेली, काही आजही भरविली जातात. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने भरविली जाणारी सुरुवातीची विद्रोही साहित्य संमेलने हा एक चांगला प्रयत्न होता. पण त्यात सामील असणाऱ्या गटांनी हळूहळू त्याला ब्राह्मणेतरचळवळीचे स्वरूप द्यायला सुरुवात केली. त्यामुळे विद्रोहीचा मूळ जातिधर्म निरपेक्ष पुरोगामी दृष्टी असणारा मुख्य दृष्टिकोनच बाजूला पडला. शिवाय त्यांच्या अंगी विद्रोह इतका भिनला की पुढे पुढे त्यांनी आपआपसांत विद्रोहाचे झेंडे उभारून या संमेलनाची गटबाजी करून टाकली. त्यामुळे त्यांचा प्रभाव पुरता ओसरला.

या बाबतीत अ. भा. मराठी साहित्य संमेलनवाल्यांना मानले पाहिजे. त्यांनी अगदी शांतपणे वर म्हटल्याप्रमाणे फुटाणे, वाटाणे, कटारे, सटारे बरोबर घेऊन आम्हीच कसे प्रातिनिधिक आहोत हे सांगायला सुरुवात केली. शिवाय विश्व संमेलन भरवून या वाटाण्या, फुटाण्यांसमोर परदेशवारीची आमिषे उभी केली. अर्थात या जाळ्यात वाटाण्या फुटाण्यांबरोबर आमचे काही मातब्बर पुरोगामी साहित्यिकही अडकले आणि बळी ठरले. विद्रोहींनी कायमस्वरूपी त्यांच्यावर बहिष्कार टाकला आहे. जो आम्हाला मान्य नाही. कारण यात आम्हीच डावे पुरोगामी कमी पडलो आहोत. आम्हाला सांस्कृतिक पातळीवरचे राजकारण या काळात जमलेले नाही. आम्हाला आजही डावे-पुरोगामी-लोकशाहीवादी सांस्कृतिक पातळीवर व्यासपीठ उभारता आलेले नाही. कुठे अण्णा भाऊंच्या नावाने तर कुठे विद्रोहीच्या नावाने आपआपले ढोल बडविण्याचे काम आम्ही करत राहिलो. आपलीच राजकीय भूमिका (लाईन) साहित्यिकांवर कशी लादता येईल याचा प्रयत्न करीत राहिलो. विद्रोही सांस्कृतिक चळवळीत कार्यरत असताना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नेहमीच सर्व डाव्या, पुरोगामी, लोकशाहीवादी घटकांना बरोबर घेऊन सर्वसमावेशकतेची भूमिका घेतली होती. पण त्यावेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या गटांच्या दृष्टीने प्रस्थापित आणि

ब्राम्हो-कम्युनिस्ट होता. त्यांना माकपबद्दल असूया होती. असो. तो आता इतिहास झालेला आहे. हे छोटेखानी गटही आता बरेच शहाणे आणि मवाळ झालेले आहेत. इतिहासापासून धडा घेणे हे सच्च्या मार्क्सवादी लोकांचे वैशिष्ट्य राहिले आहे. आपल्यासाठी वेळ कधीच गेलेली नसते. उलट आपण असेच दुभंग राहिलो तर अधिक बिकट वेळ आपल्यावर येऊन ठेपेल. नव्हे आज ती आलेलीच आहे. आता शहाणे होऊन वेगवेगळ्या राहुटया सोडून किमान सांस्कृतिक पातळीवर तरी एक राहुटी उभारायला हवी. ती काळाची गरज आहे.

'जीवन मार्ग'च्या सौजन्याने

kiranm.subhasht@gmail.com

•••

## गूगल आपल्याला मठ्ठ तर करत नाही ना?

*प्रभाकर नानावटी*

तंत्रज्ञान समाज युवा

काही तुरळक अपवाद वगळता, एका निरीक्षणानुसार आजच्या तरुण पिढीच्या मेंदूचा बराचसा भाग ईमेल्स, ट्वीटर्स, चॅट्स, स्टेटस् अपडेट्स इत्यादींनी व्यापलेला असल्यामुळे बहुतेक वेळा त्यांच्यात एकाग्रतेचा अभाव असतो व चित्त विचलित झालेले असते. अमेरिकेतील कॉलेजमधील 80 टक्के विद्यार्थी मॅसेजेस, फेसबुक, न्यूजफीड व इतर गोष्टी ताशी एकदा तरी, 10 टक्के ताशी सहा वेळा तरी वापरत असतात. व इतरांच्या बाबतीत ताशी किती वेळा याचा हिशोबच ठेवता येत नाही.

निकोलस कार या पत्रकाराने गूगल आपल्याला मूर्ख बनवत आहे का? याविषयी 2008 साली एक लेख लिहिला होता. गूगल सर्च इंजिनच्या सततच्या वापरामुळे सातत्याने आपले लक्ष बदलत असते. त्यामुळे आपल्या मेंदूचे रीवायरिंग होत असावे अशी त्याला दाट शंका होती. या रीवायरिंगमुळे आताची तरुण पिढी कुठल्याही गोष्टीचे जास्त खोलात जाऊन विचार करू शकत नाही. आपल्यातील उपजत शहाणपणाचा वापर आता उपयोजित गोष्टीसाठीच होत आहे. अनेक वेळा ताबडतोबीच्या समस्यांकडे लक्ष देत असल्यामुळे ध्यानपूर्वक, चहूबाजूने विचार करण्याची बुद्धिमत्ता हळू हळू कमी होत आहे. तुकड्या तुकड्याने माहिती गोळा करण्याच्या नादात खोलात जाऊन विचार करण्याची बुद्धिशक्ती हरवून जाईल की काय याची चिंता लेखकाला वाटत आहे.

परंतु गूगलचे समर्थक मात्र या गोष्टीशी सहमत नाहीत. त्यांच्या मते मेंदूत माहिती भरण्यात व तेथून माहिती काढून घेण्यात वेळ घालविण्यापेक्षा इतर महत्त्वाच्या गोष्टींसाठी मेंदूचा वापर करत राहणे इष्ट ठरेल. गूगलवर सहजपणे मिळणारी माहिती डोक्यात ठेवून घेणे हे काही बुद्धिमत्तेचे लक्षण नाही. फार फार तर याला बुद्धिमत्तेची एक बाह्य बाजू म्हणता येईल. माहितीबद्दलची स्पष्ट कल्पना एकदा आल्यानंतर त्याच्या विश्लेषणातून समस्येला उत्तर शोधणे यासाठी बुद्धिमत्तेचा वापर करणे योग्य ठरेल. 14 -15 वर्षे वय असलेल्या एखाद्यानी तोंडपाठ केलेले पाय या अपरिमेय

संख्येतील शंभरेक आकडे अचूकपणे फाडफाड सांगणे कदाचित गंमतीदार असू शकेल. परंतु पायचे आकडे शोधण्यासाठी सॉफ्टवेअर लिहिणाऱ्यापेक्षा तो सरस ठरत नाही. चाइल्ड प्रॉडिजी शकुंतलादेवीसारखे 40 - 50 आकड्यांचा गुणाकार वा भागाकार काही क्षणात करून दाखविण्यापेक्षा गणितविषयात काही नवीन भर घालणे ही खरी प्रतिभा असेल.

माहिती तंत्रज्ञानाचा विकास होण्यापूर्वीची पिढी जास्तीत जास्त 20 -25 गोष्टी लक्षात ठेवत असे. परंतु आताच्या दुसऱ्या सहस्त्रकाच्या पिढीत हजारो गोष्टी लक्षात ठेवण्याची क्षमता आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण त्यांच्यासाठी गूगल आता त्यांच्या मेंदूचाच एक भाग बनू पाहत आहे. एका चाचणीमध्ये कॉलेज-विद्यार्थ्यांचा एका गटाला चाळीसेक पशु-पक्ष्यांची नावे लिहून काढण्यास सांगितले होते. त्यातील काही विद्यार्थ्यांना आपण लिहिलेली नावे संगणकाच्या हार्ड डिस्कवर सेव्ह करता येईल व इतर काही जणांना संगणकाच्या हार्ड डिस्कवरून डिलीट केले जाईल असे सांगण्यात आले. काही दिवसानंतर याच विद्यार्थ्यांची तीच चाचणी घेतल्यानंतर ज्यांना संगणकावर माहिती उपलब्ध होईल असे सांगितले होते त्या विद्यार्थ्यांनी तुलनेने फारच कमी नावे लक्षात ठेवण्याचे कष्ट घेतले होते. कारण संगणकावर माहिती उपलब्ध असल्यामुळे लक्षात ठेवण्याचा त्रास त्यांनी घेतला नव्हता. झेरॉक्स कल्चरचा अनुभवही याहून वेगळा नाही.

गूगलची ही आक्रमकता आपल्या स्मृतिपटलावर काही परिणाम करत असावे. कारण मेंदूपेक्षा आपला जास्त भरवसा कीबोर्डवर आहे. काही तज्ज्ञांच्या मते स्वतःच्या हस्ताक्षरातून उमटलेले शब्द (व आशय) कीइंग - इन् केलेल्या शब्दांपेक्षा व्यवस्थितपणे मेंदूपर्यंत पोचू शकतात. कीइंगमुळे काही महत्त्वाचे मुद्दे मेंदूत ध्वनित होत नाहीत. यासंबंधीची एक चाचणी घेण्यात आली. काही विद्यार्थ्यांना हस्ताक्षरात एक परिच्छेद कागदावर उतरवून घेण्यास सांगण्यात आले. व इतर काहींना टाइप करून प्रिंट घेण्यास सांगण्यात आले. काही दिवसांनी या विद्यार्थ्यांना परिच्छेदातील माहितीबद्दल काही जुजबी प्रश्न विचारल्यानंतर ज्यांनी (जुनाट पद्धतीप्रमाणे) हस्ताक्षरातून परिच्छेद उतरवून काढले होते त्यांना इतरांपेक्षा जास्त गोष्टी आठवत होत्या. कित्येक शतकापासून जोपासलेली ही आठवणीत साठवण्याची क्षमता हळू हळू कमी होत आहे. यानंतरची पिढी हस्ताक्षराची सवय पूर्णपणे विसरून कीइंग - इन् वरतीच भरवसा ठेवतील.

खरे पाहता स्मृतीबद्दल येवढे हळवे व्हायची काही गरज नाही व काळजी करण्याचे कारण नाही. तरीसुद्धा कुठल्याही गोष्टीचा फार खोलात जाऊन, समस्येकडे लक्ष केंद्रित करून विचारपूर्वक निर्णय घेण्यापेक्षा वरवरच्या माहितीच्या आधारे उत्स्फूर्ततेने निर्णयापर्यंत पोचण्याची सवय घातक ठरणार आहे, हे मात्र निश्चित. एका तज्ज्ञाच्या मते हाताने लिहिण्याच्या वा हार्ड कॉपी वाचण्याच्या सवयीमुळे एका प्रकारचे बुद्धिमत्तेचा तरंग उमटत लेखकाच्या आशयाचे नीटपणे आकलन होऊ शकते. गूगल/ संगणक वरील त्रोटक माहिती मुळे मूळ आशय हरवून जाण्याची शक्यता आहे.

ट्वीटर्स, स्मार्ट फोन्स, सातत्याने टेक्स्टिंग वा चेकिंगच्या जमान्यापूर्वीचा होता. गेल्या 4 - 5 वर्षांत हे सर्व माहितीचे स्त्रोत मोठ्या प्रमाणात विकसित झाले असून आपले जीवन व्यापून टाकत आहेत. पुढील काही वर्षात केवळ लॅपटॉपच नव्हे तर मोबाइल व टॅब्लेट्स प्रत्येक क्षणाला आपले चित्त विचलित करणार आहेत. तुम्ही कुठेही जा, त्या तुमचे पाठलाग करणार आहेत - कारमध्ये, रस्त्यावर, ऑफिसच्या ठिकाणी, महत्त्वाच्या मीटिंग्सच्या वेळी...... अगदी तुम्ही बाथरूममध्ये असतानासुद्धा! शांतपणे एखाद्या ठिकाणी विचार करण्याससुद्धा तुम्हाला यानंतर शक्य होणार नाही. कदाचित असली ठिकाणे काळाच्या उदरात नष्ट होऊन जातील. वॉटरप्रूफ आयपॉड वापरत शॉवर घेणाऱ्या

महाभागांची संख्या आताच कमी नाही! कारच्या लेखाचा प्रतिवाद करणारा एक लेख जमाइस कास्किओ (Jamais Cascio) या संशोधकाने लिहिला आहे.

त्याच्या मते गूगलमुळे आपण, ढ, मूढ वा मूर्ख असे काही होत नाही. उलट वेबच्या जंजाळातून नेमकी माहिती शोधून आपल्या फायद्याच्या गोष्टीसाठी वापर करण्याची कुशलता आपल्या मेंदूत येऊ घातलेली आहे. खरे तर आपण आता मागच्या पिढ्यांपेक्षा जास्त चाणाक्ष आहोत. एकपाठी, एकाग्रता, फोकस्ड, वा लक्ष केंद्रित करणे आता आपल्याला जमत नसले तरी आपली बुद्धिमत्ता जास्त तरल, तल्लख, सक्षम, हजरजबाबी होत आहे. गडबड - गोंधळातून मार्ग काढणे, गुंतागुंतींची उकल करणे, नवीन समस्यांना धडाडीने सामोरे जाणे, धोका पत्करणे इत्यादी गोष्टी या बुद्धिमत्तेची देणगी आहे.

अलिकडेच काही नसतज्ज्ञ गूगलसॅव्हींच्या मेंदूतील बदलाकडे लक्षपूर्वक अभ्यास करत आहेत. fMRIची सुविधा वापरून गूगलसॅव्हींचा मेंदू कसा काम करतो याचा शोध ते घेत आहेत. त्यासाठी 55 ते 77 वयोगटातील 24 जणात 12 जण गूगल व तत्सम सुविधांचा गेली 10 वर्षे सातत्याने वापर करणाऱ्यांची व इतर 12 जण कधीच गूगल न वापरलेल्यांची अभ्यासासाठी निवड केली. हे दोन्ही गट जेव्हा पुस्तक वाचत होते तेव्हाच्या त्यांच्या मेंदूंच्या एमआरआय स्कॅनमध्ये मेंदूतील temporal, parrietal व occipital lobe हे भाग क्रियाशील झालेले आढळले. साधारणपणे भाषा, स्मृती वा काही तरी निरखून पाहताना हे भाग क्रियाशील होत असतात.

नंतरच्या चाचणीत या सर्वांना गूगलवर चॉकोलेट खाल्यामुळे आरोग्याला काय फायदा मिळतो? याचा शोध घेण्यास सांगितले. व त्यांच्या मेंदूंचे एमआरआय स्कॅनिंग करण्यात आले. गूगलवर सर्फिंग करणाऱ्यांच्या काहींच्या बाबतीत वाचनाच्या वेळी क्रियाशील असलेल्या मेंदूच्या पृष्ठभागाव्यतिरिक्त आणखी काही पृष्ठभाग सर्फिंग प्रक्रियेत भाग घेत असलेले एमआरआय स्कॅनिंगमध्ये चित्रित होऊ लागले. हे अतिरिक्त पृष्ठभाग सामान्यपणे गुंतागुंतींच्या प्रश्नांचा विचार करताना, महत्त्वाचे निर्णय घेत असताना वा दृश्य संकलन करताना कार्यरत होत असतात. गूगलशी अपरिचित असलेल्यांचे मेंदू मात्र जुळवून घेण्याच्या मार्गावर होते व त्यांच्या मेंदूच्या fMRI मध्ये फार बदल आढळला नाही.

नसतज्ज्ञांच्या मते गूगलवरील वेबचा शोध मेंदूतील काही सर्क्यूट्सना उत्तेजित करत असावे. व ही सर्क्यूटरीची प्रक्रिया हळू हळू विकसित होत गेली असावी. वृद्धापकाळात जाणिवांचे आकुंचन होण्याच्या प्रक्रियेला थोपवू शकणारी ही क्षमता आहे, असा निष्कर्ष या अभ्यासातून काढला गेला. तरुण पिढीच्या मेंदूतही असेच काही तरी घडत असावे, असे त्यांना वाटू लागले.

अत्यंत प्राथमिक स्वरूपात ही चाचणी असली तरी गूगल आपल्याला ढ करू पाहते यास प्रतिवाद करण्यास पुरेसे आहे, असे तज्ज्ञांना वाटते. नेटिझन्सच्या मेंदूत वेगळे बदल करण्याची क्षमता गूगलमध्ये आहे, असेही आपल्याला म्हणता येईल. आपल्या मेंदूत आमूलाग्र बदल करण्याची क्षमता कीबोर्ड व डोळ्यांसमोरील स्क्रीन वर आहे, याबद्दल दुमत नसावे. फक्त हा बदल सुखावह की ....आणखी काही तरी हे पुढील काळच ठरवू शकेल!

pkn.ans@gmail.com

•••

# 'मनरेगा'च्या कंत्राटीकरणाचा धोका!

*अश्विनी कुलकर्णी*

खाउजा अर्थकारण राजकारण विकास

एखाद्या मध्यम शहरात विमानतळाची गरज आहे, येथील लोकांना - खास करून व्यावसायिकांना विमानसेवेची गरज आहे. कारण त्यामुळे येथील अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. हे विधान निर्विवादपणे सत्य आहे असे मानले जाते. असे मानताना इथे विमान सेवा सुरू करण्यासाठी शासनाला नेमका खर्च किती येईल, त्याचा परतावा कसा व केव्हा मिळू शकतो, याची आपण चर्चा करीत नाही. उड्डाणपूल, महामार्ग अशा पायाभूत सुविधांसंबंधी आपले मत काहीसे असेच असते. या सर्व गोष्टी विकासाला चालना देणाऱ्या असतातच असे आपले गृहीतक असते; पण सह्याद्रीच्या डोंगरकुशीतल्या बंधाऱ्यांबद्दल, शेततळ्यांबद्दल आपली अशीच भूमिका असते का?

नाशिक जिल्ह्याच्या त्र्यंबक तालूक्यातील हाणपाड्याला पाच तलाव बांधले गेले व आता पहिल्यांदाच त्या गावात रब्बीचे पीक शेतकरी घेत आहेत. मत्स्यशेतीही करीत आहेत. चिंचले गावाच्या पाच किलोमीटर अंतरावरून चौपदरी गुळगुळीत राष्ट्रीय महामार्ग जातो, तरीही या गावाला मात्र रस्ता दोन वर्षांपूर्वी मिळाला. कच्चा का असेना, रस्ता आल्याने गावात काळीपिवळी जीप येऊ लागली आणि शेतातील माल नेणे, आजारी माणसाला नेणे व मुलांना पुढच्या शाळेत, महाविद्यालयात रोजचे जाणे-येणे करणे शक्य झाले. हे सर्व महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेमुळे म्हणजे 'मनरेगा'मुळे साधले गेले.

विमान सेवा, महामार्ग यांतून जशी विकासाला चालना मिळते तशीच चालना गावातील पाणी साठवण्याची तळी व रस्ता यामुळे देखील मिळते आणि त्याचा फायदा थेटपणे सर्वांत तळातील माणसाला मिळतो. यात खरे तर न पटण्यासारखे काय आहे? विकासासाठी काय केले पाहिजे हे तेथील लोक विकासाच्या कोणत्या टप्प्यावर आहेत यावरून ठरवायचे असते. केवळ किती लोकांना लाभ होणार यावर विकास ठरवायचा की लोकांच्या आयुष्यात कोणता फरक पडणार आहे ही गुणात्मक मोजपट्टीही लावायची, हेही पाहायचे असते.

वरील मुद्यांबाबत वाद असू शकतात. अधिकाधिक लोकांचा फायदा हेच लोकशाहीचे ध्येय, असे युक्तिवाद मांडले जाऊ शकतात. तरीही एक महत्त्वाचा फरक उरतो. हा फरक आर्थिक पायावरला आहे आणि त्यातून आपली- शहरीकरणाच्या प्रक्रियांना शरण गेलेल्यांची- मानसिकता उघड होत असते.

नाशिकसारख्या शहरासाठी विमानतळ हा सरकारी खर्चाने खासगी कंपनीतर्फे बांधला जाणार असतो. गावातील तळी अथवा बंधारे हे गावातल्याच लोकांच्या नियोजनातून, त्यांनी केलेल्या मजुरीतून बांधले जातात व त्याचा वापरही तेच करतात आणि कष्टाने स्वत:चा विकास करून घेण्याचा प्रयत्न करतात. विमानतळ, उड्डाणपूल यांमधील गुंतवणुकीला आपण 'विकासासाठी करायची गुंतवणूक' म्हणतो; परंतु रोहयोमधून निर्माण झालेल्या संसाधनांना मात्र 'अनुदान' ठरवतो.

मनरेगातून ग्रामीण भागातील गरिबाला मागेल तेव्हा, मागेल तितके काम मिळू शकते, केलेल्या अंगमेहनतीचे दाम मिळू शकते व त्यातून सन्मानाने मजुरी कमवता येते. याचबरोबर त्यांना उपजीविकेची साधने बांधून मिळतात. गावात

रस्ते होतात. पाणलोटाची कामे झाल्याने शेतीसाठी, गुरांसाठी पाण्याची उपलब्धता होते. मातीची धूप थांबल्याने शेतीची उत्पादकता वाढते. या मूलभूत संसाधनांशिवाय खेड्यांचा विकास शक्य आहे का?

ज्या कायद्याने हे शक्य झाले त्या मनरेगामध्ये आमूलाग्र बदल करण्याचे प्रयत्न केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयातून सुरू झाले आहेत. सध्याच्या राष्ट्रव्यापी मनरेगाच्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर करून काही बदल करण्याची गरज नक्कीच आहे. पण प्रस्तावित बदल हे त्यासाठीचे नाहीत. प्रस्तावित बदलातून मनरेगा संकुचित होणार आहे.

मनरेगाचे मूळ उद्दिष्ट 'अकुशल मजुराला कामाची संधी त्या मजुराच्या आवश्यकतेप्रमाणे मिळावी' असे आहे आणि याच कामातून गावात मूलभूत संसाधने, शेतीच्या उत्पादकतेशी निगडित कामे निर्माण करायची आहेत. आणि असे व्हावे म्हणून गावात जी काही संसाधने निर्माण होतील त्यावरील किमान ६० टक्के खर्च हा अकुशल मजुरीवर करायचा व जास्तीत जास्त ४० टक्के खर्च इतर साधने, कुशल मजुरी अशा बाबींवर करायचा असा नियम आहे. आता हाच नियम बदलण्याचा प्रस्ताव आहे. अकुशल मजुरीवरचा खर्च ५१ टक्के व मटेरियलचा खर्च ४९ टक्के असे करण्यात यावे असे केंद्र सरकारने मांडले आहे. हे कशाकरिता? आणि याचे परिणाम काय होणार?

'मटेरियल'वरील खर्च वाढवल्याने अधिक चांगल्या प्रतीची संसाधने उभी करता येतील ही समजूत निराधार आहे आणि शेतीशी निगडित कामे, पाणलोटाची कामे यांचा दर्जा सुधारण्यासाठी अशा बाह्य साधनसामग्रीपेक्षाही, योजनेच्या पूर्वानुभवातून लक्षात आलेली गरज ही अधिक चांगले नियोजन व योग्य तांत्रिक आराखडा तयार करण्याची आहे. एकीकडे केंद्र सरकारचे ग्रामीण विकास मंत्रालय मनरेगातून अधिकाधिक शेतीशी संबंधित कामे व्हावीत, असे म्हणत असताना दुसरीकडे हा प्रस्ताव मांडला जाणे हे सुसंगत नाही. शेतीशी निगडित कामे पाणलोट तंत्रज्ञानातूनच उभी राहू शकतात आणि त्यासाठी स्थानिक साधनसामग्रीच वापरली जाते.

महाराष्ट्रातील मनरेगातून झालेल्या कामांचा महाराष्ट्रातील एका नामवंत संस्थेने (इंदिरा गांधी संशोधन आणि विकास संस्था) नुकताच एक सखोल अभ्यास केलेला आहे. त्यात हे स्पष्ट दिसते की, निर्माण झालेल्या संसाधनामुळे ग्रामीण विकासाला चालना लाभली आहे. संसाधनांची गुणवत्तादेखील चांगली आहे आणि महत्त्वाचे असे की, संसाधनांच्या गुणवत्तेचा व उपयुक्ततेचा त्यावरील साधनसामग्रीच्या खर्चाशी थेट संबंध नाही. हा संबंध प्रामुख्याने चांगल्या तांत्रिक आराखड्याशी आहे. याच अभ्यासात असेही दिसते की, जास्तीत जास्त कामे शेतीशी निगडित झालेली आहेत. म्हणजे जमिनीचे सपाटीकरण, विविध प्रकारचे बांध, चर, तळी, नर्सरी, वृक्षलागवड अशी ही कामे आहेत. या सर्व संसाधनांचा वापर करणाऱ्यांपकी ८० ते ९० टक्के कुटुंबांनी यासंबंधी समाधान व्यक्त केलेले आहे. हे थेट उपभोगकर्त्यांचे म्हणणे आहे. त्यांच्याशिवाय या कामाच्या उपयुक्ततेची आणि गुणवत्तेची ग्वाही दुसरे कोण देऊ शकणार?

तरीदेखील साधनसामग्रीचा खर्च ४९ टक्क्यांपर्यंत वाढवल्याने कोणाला नेमका फायदा होणार, या प्रश्नाचे उत्तर स्पष्ट आहे. फायदा कंत्राटदारांनाच होणार. मनरेगामध्ये कंत्राटदार शिरणे हा या बदलाचा मोठाच धोका आहे. कंत्राटदारांनी महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचे काय केले आहे याचे विश्लेषण करायची गरज नाही.

दुसरा महत्त्वाचा प्रस्ताव असा आहे की, मनरेगा आता पूर्ण ग्रामीण भागात न राबवता काही निवडक जिल्ह्यांतच राबवली जावी. हे अतर्क्य आहे. अकुशल गरीब जनता ग्रामीण भागात सर्वत्र आहे. त्यामुळे या बदलामुळे त्यांच्या कामाचा हक्कच हिरावून घेतला जाईल आणि मनरेगाच्या गाभ्यालाच नख लागेल. शिवाय या निर्णयाचा परिणाम इतर

राज्यांसाठी व महाराष्ट्रासाठी वेगळा असणार आहे. महाराष्ट्राचा स्वतंत्र रोहयोचा कायदा आहे, तेव्हा आपल्या कायद्याप्रमाणे आपल्या शासनाला संपूर्ण राज्यात रोहयो राबवावी लागेल; परंतु वरील बदल झाल्यास राज्याला केंद्राकडून निधी सर्व भागांसाठी मिळणार नाही. राज्याला स्वत:चा निधी वापरावा लागेल. यात राज्याचे नुकसान आहे.

सुशासनाचा नारा देऊन भाजपने दणदणीत विजय मिळवून केंद्रात व राज्यात सरकार स्थापन केले आहे. सुशासन हे 'आपल्या'ला महत्त्वाचे वाटते, तितकेच ते राज्यातील ग्रामीण गरिबांसाठीदेखील महत्त्वाचे आहे. याच आशेने त्यांनी मतदान केले; पण अशा बदलांमुळे त्यांची विकासाची संधी हरवणार का?

'लोकसत्ता'च्या सौजन्याने

pragati.abhiyan@gmail.com

•••

# चित्रगुप्ताची चोपडी

*य. ना. वालावलकर*

श्रद्धा-अंधश्रद्धा चिकित्सा

"त्र्यंबकेश्वरी कालसर्पयोगाचे नारायण-नागबळी विधी करणारे तोता भट आसन्न मरणावस्थेत होते..... ते निधन पावले ... पापपुण्याची झाडाझडती देण्यासाठी चित्रगुप्तासमोर उभे राहिले. चित्रगुप्त म्हणाला, 'माझ्या वहीतील नोंदीप्रमाणे दिसते की तू नागबळी नावाचा विधी करायला भाग पाडून एक हजार नऊशे एकसष्ठ जणांना लूबाडण्याचे मुख्य पाप केले आहेस. म्हणून तुला तेव्हढे दिवस नरकवास भोगवे लागेल. अन्य लहान सहान पापे आहेतच. '

"मी हे सगळे धर्मशास्त्रानुसार केले.ते पाप कसे असेल?"

"माझ्यासमोर खोटे बोलायचे नाही.मी चित्रगुप्त आहे.त्र्यंबकेश्वराला आलेले तुझे भोळसट, श्रद्धाळू गिऱ्हाईक नव्हे. कुंडलीतील राहू-केतू बिंदू जोडणाऱ्या सरळ रेषेच्या एका बाजूला सगळे ग्रह पडले म्हणजे कालसर्पयोग होतो. तो त्या व्यक्तीला घातक असतो, असे तुम्ही सांगता ते श्रुति-स्मृति-पुराणोक्त आहे काय ? कुंडली तरी कोणत्या धर्मशास्त्रात आहे काय ? सांगा पाहू. श्रद्धाळूंना फसवण्यासाठी तुम्हीच निर्माण केलेली ही सगळी बनवाबनवी आहे.त्यासाठी शास्त्राधार मुळीच नाही".

"पण मी तिरुपती बालाजी,अष्टविनायक,आदि अनेक तीर्थयात्रा केल्या आहेत. काशीला जाऊन पर्वकाळी शुभमुहूर्तावर गंगास्नान केले आहे.सत्यनारायणव्रत तर प्रतिवर्षी करत होतो. त्यामुळे शास्त्रवचनांनुसार माझ्या पापांचे क्षालन झाले असेलच."

"हे सगळे तुमच्या मनाच्या समजुतीसाठी. खोटेनाटे सांगून लोकांना फसवल्याचे मनात खात असते ना! त्यातून थोडी सुटका मिळवण्यासाठी करावयाचे हे भ्रामक उपाय आहेत.इकडे कर्मफलसिद्धान्त सांगायचा आणि तिकडे पापक्षालनाचे उपाय करायचे.काय ही विसंगती! किती ही आत्मवंचना !! तू अनेक गरिबांनासुद्धा लूबाडले आहेस.या पापातून सुटका नाही.नरकवास भोगावाच लागेल."

"पण तो चुकवण्याचा काहीतरी मार्ग असेलच ना?" तोता भट म्हणाला.

"तो निरर्थक,निरुपयोगी नागबळी विधी अनेकांना करायला लावून तू खूप संपत्ती गोळा केली आहेस.त्या सगळ्याची नोंद माझ्या चोपडीत आहे.पण तो पैसा राहिला घरी.इथे त्याचा काही उपयोग नाही. नियमाप्रमाणे नरकात जाणे अटळ आहे."

"या नरकवासाचे स्वरूप काय असते?"

" आता आलास सरळ! पाप केले आहेस हे पटले ना? या पापासाठी सर्पनरकभोग आहे.एका मोठ्या हौदात खूप साप ठेवले आहेत. तिथे तुला एकहजार नऊशे एकसष्ट दिवस कंठावे लागतील. ते गार गिळगिळीत साप तुझ्या अंगावर सतत सरपटत राहातील. तुझ्यासारखे अनेकजण तिथे अशा नरकयातना भोगत आहेत."

" तिथे स्नानसंध्येची तरी काही व्यवस्था असेल ना?"

"स्नानसंध्या? हा ! हा! हा! सकाळी आंघोळ,पूजा-अर्चा आटोपून कपाळावर गंधाचे किंवा कुंकुमाचे टिळे लावून वरवर शुचिर्भूत होऊन पुण्यकृत्य केल्यासारखे दाखवायचे.मग दिवसभर सावजे गाठून पापे करायला मोकळे! नरकात तसले काही नसते.खाणे-पिणे नसते.मरणही नसते. केवळ यातना भोगायच्या.तुझ्या सर्वांगावरून साप सतत फिरणार."

"पण माझ्या देहाचे दहन झाले आहे.शरीरच नाही तर साप अंगावरून कसे सरपटणार?"

"शाबास! थोडे थोडे तुझ्या ध्यानी येत आहे.खरे तर तुझा अजून मृत्यू झालेला नाही.तू मरणासन्न अवस्थेत मृत्युशय्येवर आहेस."

"मेलेलो नाही? मग चित्रगुप्तासमोर उभा कसा?"

"कुठला चित्रगुप्त? अंतकाळी तुझा तुझ्याशीच चाललेला हा संवाद आहे.तुझी सदसद्विवेकबुद्धी म्हणजे मी, चित्रगुप्त.आयुष्यभरात तू जे काही पापपुण्य केलेस त्याच्या सचित्र नोंदी तुझ्या मेंदूच्या स्मृतिकेंद्रात आहेत.तीच माझी चोपडी.तू काय काय केलेस ते सगळे कुणा त्रयस्थाला कसे कळणार? आता मेंदूतील ती जीवनचित्रपटदृश्ये तुझ्या डोळ्यांपुढून वेगाने सरकत आहेत.भोळसट श्रद्धाळूंना लूबाडून तू पाप केले आहेस.त्याचे फळ म्हणून तुला नरकयातना भोगाव्या लागणार असे तुला मी,म्हणजे तुझी सदसद्विवेकबुद्धीच सांगत आहे."

"मी असे करायला नको होते.शिक्षकाची नोकरी होती.त्यात कुटुंबाचे भागले असते."

"हे तुझ्या बुद्धीला त्यावेळीही समजत होते.पण लोभ,मोह अशा मनोविकारांनी बुद्धीवर मात केली.पुढे या धंद्यात विनायास खूप प्राप्ती होऊ लागली.पैसा वाढल्यावर विषयोपभोग,रंगढंग सुचू लागले.अंतर्मनात टोचणी लागली होती.तिच्या शमनार्थ तीर्थयात्रा,जपजाप्य,सत्यनारायण व्रत असे उपाय केले. ते सगळे निरर्थक आहे हे बुद्धीला कळत होते पण भावनेला वळत नव्हते.अंतकाळी सगळे आठवलेच."

"मी अजून जिवंत आहे तर!"

"मनात तोच विचार चालला आहे वाटते ! जगण्याची आशा तुटत नाही का? पण आता मरण अटळ आहे. अगदी जवळ आले आहे.म्हणून आपले निधन झाले,अंत्यसंस्कार झाले असे भासले.आता नरकयातना भोगाव्या लागणार याची जाणीव झाली."

"मृत्यूनंतर नरकवास नसतो का?"

"मृत्यूनंतर काहीच नसते.हे पटवून देण्याचा मी अनेकदा प्रयत्न केला.पण उपयोग झाला नाही.प्रत्येक वेळी भावनेने बुद्धीवर मात केली. नरकातील यातना तसेच स्वर्गातील सुखे या गोष्टी मानसिक पातळीवर भोगायच्या

असतात.आयुष्यातील सर्व घटनांचा पट मृत्यूपूर्वी काही काळ विद्युत् वेगाने दृष्टिपटलावरून सरकत असतो. ज्यांनी सत्कृत्ये केलेली असतात त्यांना सुख, समाधान, कृतकृत्यता वाटते.तसे आयुष्यभर त्यांना सुखसमाधान लाभतच असते.तेच स्वर्गसुख.

ज्यांनी दुष्कृत्ये केलेली असतात त्यांना ती आठवून मानसिक यातना होतात. हा नरकवास म्हणायचा. खरे तर हे अगदी अल्पकाळ असले तरी आपण वर्षांनुवर्षे नरकवास भोगतो आहोत असे वाटते.काळ सापेक्ष असतो.तसेच केल्या पापाचे शल्य नेणिवेच्या पातळीवर आयुषभर टोचतच असते."

"मग मी आता काय करू?"

"आता तुझ्याहाती काही नाही.

श्वासोच्छ्वास थांबेपर्यंत शारीरिक आणि मानसिक पातळीवर जे घडत राहील ते सोसायचे. दुसरे काय?"

ynwala@gmail.com

•••

# कुंभारवाडा

*राजेश घासकडवी*

काळ्या डागांनी गालबोटलेल्या सूर्याने फुंकलेले वारे
भन्नाट भिरभिरतात पृथ्वीच्या चुंबकीय भोवऱ्यात
मग उभं राहातं ध्रुवप्रदेशात अरोरा बोरिआलिसचं अद्भुत प्रकाशशिल्प,
न्हाऊ घालत घनतिमिर थंडगार प्रदीर्घ रात्रीला
दिसतात कधी सप्तरंगाचे तुषार उडणाऱ्या थेंबांतून निघताना
घुसमटलेल्या प्रतिभेच्या अनावर उन्मेषाप्रमाणे
आणि बहरून येतात फ्रॅक्टल्सच्या अनंत वृक्षांवर रंगभरली फुलं
प्रत्येक परागात त्या वृक्षाच्या अनंत प्रतिमा बाळगून

कुंभारवाड्यात मात्र अजूनही भाजली जातात त्याच जुनाट मातीची भांडी
चार साच्यांची विविधता व अर्धज्ञानी बोटांच्या ठशांची समृद्धता मिरवत
तोच कंटाळवाणा चंद्र जातो ठरल्याप्रमाणे लिंबोणीच्या झाडाआड,
आणि छचोर तोता मैनेच्या पिंजऱ्यावर सावलीचं जाळं पडतं
लाजेचं काजळ थोबाडावर पसरून मग सूर्यच काळाठिक्कर पडतो
आणि युगायुगांची रात्र निर्लज्जपणे फैलावत राहाते.

ghaski@gmail.com

•••